ePaper

वर्ष - 8 । अंक - 311 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

www.mahaenews.com । शुक्रवार, दि. 20 जून 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## दोन्ही शिवसेना आणि मनसेने एकत्र यायला हवे : गजानन कीर्तिकर




**आतील पानांत**

- टीम इंडियाचं टेन्शन वाढणार?
- "कर्माचं फळ नक्की मिळतं"
- हल्ला करण्याचा विचारही करू नका
- लोकशाही असल्याचा दावा नाही


### शिवसेना वर्धापनदिनाचे मुंबईत दोन मिळावे : उद्धव ठाकरे यांचा टीका, टोमणे मारणारा, तर एकनाथ शिंदेंचा प्रत्युत्तर देणारा!

# मुंबई महापालिकेचे रणशिंग!

### मुंबई महानगरपालिका निवडणुकीचा नारळ तर फुटला, आता दोन्ही शिवसेनेचा राडा

। मुंबई । प्रतिनिधी । महाईन्यूज

**कम ऑन किल मी... उद्धव ठाकरेंच्या चॅलेंजवर एकनाथ शिंदे यांचं खणखणीत उत्तर, म्हणाले, मरे हुए को... शिवसेनेच्या 59 व्या वर्धापन दिनानिमित्त झालेल्या दोन मेळाव्यांमध्ये उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांच्यात तीव्र वाद झाला. उद्धव ठाकरे यांनी 'कम ऑन किल मी' असा आव्हान देत एकनाथ शिंदे यांना निशाणा साधला, तर शिंदे यांनी त्यांना जोरदार प्रत्युत्तर दिले.**




#### दोन शिवसेना, दोन मिळावे

शिवसेनेमध्ये फूट पडल्यामुळे दोन्ही शिवसेनेने वेगवेगळे मिळावे घेतले. वास्तविक, एकनाथ शिंदे यांच्याकडे निवडणूक आयोगाने शिवसेना नाव आणि चिन्ह दिले असले, तरी उबाठा गट अजूनही स्वतःला अधिकृत शिवसेना समजत असल्यामुळे त्यांचाही मेळावा झाला.

#### ठाकरेंचा एल्गार, शिंदेंचे प्रत्युत्तर

शिवसेना उबाठा गटाचा वर्धापन दिनाचा सोहळा षण्मुखानंद हॉलमध्ये पार पडला. यावेळी उद्धव ठाकरेंनी 'कम ऑन किल मी' असा एल्गार केला. त्यावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबईतील वर्धापन दिनाच्या सोहळ्यादरम्यान केलेल्या भाषणावेळी जोरदार प्रत्युत्तर दिले.

#### उद्धव ठाकरे काय म्हणाले?

उद्धव यांनी १९९२-९३ च्या मुंबईतील दंगलीची आठवण करून दिली. त्यावेळी, जेव्हा दंगा भडकला होता, तेव्हा तुम्हीच रस्त्यावर उतरला होता. तेव्हा एक व्यक्ती वंदनीय बाळासाहेबांकडे आली होती. बाळासाहेब आता बस्स झालं.. पुरे झालं.. ती व्यक्ती कोण सांगणार नाही. ते हयात आहेत, असे उद्धव ठाकरे म्हणाले. यानंतर उद्धव यांनी शिंदेंवर अप्रत्यक्षपणे निशाणा साधला. यावेळी त्यांनी नाना पाटेकर यांच्या 'प्रहार' चित्रपटाचा संदर्भ दिला. 'मीप्रहार पाहिला. नाना पाटेकर यांचा. त्यात नाना पाटेकर गुंडासमोर उभा राहतो आणि सांगतो 'कम ऑन किल मी'. तसा मी या गद्दारांसमोर उभा आहे. म्हणतोय 'कम ऑन किल मी'. असेल हिंमत तर या अंगावर. फक्त अंगावर येणार असाल, तर एक गोष्ट नक्की करा. अमिताभचा पिक्चर होता ना..ॲम्ब्युलन्स घेऊन येतो. त्याप्रमाणे, येत असाल तर ॲम्ब्युलन्स घेऊन यायची. येताना सरळ याल. जाताना आडवे होऊन जाल." असा इशारा ठाकरेंनी दिला.

#### 'कम ऑन किल मी!'

आपल्या ठाकरेस्टाईल मध्ये बोलताना उद्धव ठाकरे यांनी एका सिनेमामध्ये प्रसंग सांगितला. कोणालाही न घाबरणारा नाना पाटेकर आपल्या शत्रूंसमोर जातो आणि म्हणतो कम ऑन किल मी.. तसा मी या गद्दारांना आव्हान देतो, या आणि मला ठार करा. उद्धव ठाकरेंच्या चॅलेंजवर एकनाथ शिंदे यांनी खणखणीत उत्तर दिले, म्हणाले, मरे हुए को क्या मारना ? ते इंग्लंडला गेले होते एखादा इंग्रजी पिक्चर बघून आले असतील, त्यामुळे इंग्लिश डायलॉग मारत आहेत अशी खिल्ली त्यांनी उडवली.

#### डॉ. श्रीकांत शिंदे यांची मुलाखत

एकनाथ शिंदे यांच्या मेळाव्यात खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांची तसेच खासदार मिलिंद देवरा यांची ज्येष्ठ पत्रकार उदय निरगुडकर यांनी मुलाखत घेतली. ऑपरेशन सिंदूर नंतर भारताची भूमिका परदेशात मांडण्यासाठी जी शिष्टमंडळे गेली होती, त्यातील एकाचे नेतृत्व डॉ. श्रीकांत शिंदे यांनी केले होते तर एका शिष्टमंडळातून मिलिंद देवरा हे प्रतिनिधी म्हणून सामील झाले होते. भारताची भूमिका सांगताना पाकिस्तानचा दहशतवादी चेहरा उघड करण्याची कामगिरी या शिष्टमंडळांवर सोपविण्यात आली होती.

#### शिंदेंची उत्तुंग टोलेबाजी...

उद्धव ठाकरे यांच्या टीकेला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले.. त्यांनी उत्तुंग टोलेबाजी केली. 'इंग्रजी चित्रपट पाहून आले असतील. लंडनला सुट्टीसाठी गेले होते, असे एकनाथ शिंदे मिश्किलपणे म्हटले. 'मरे हुए को क्या मारना है', अशी टीका त्यांनी केली.

#### आधीच मुडदा पाडला आहे..

महाराष्ट्राच्या जनतेने विधानसभेत तुमचा मुडदा पाडलेला आहे. नुसता 'करून नाही शोर, मनगटात येत नाही जोर' हे लक्षात ठेवा. वाघाचे कातडे पांघरून लांडगा वाघ होत नाही. त्याला 'शेर कलेजा लगता है' आणि मनगटात जोर लागतो. नुसत्या तोंडाच्या वाफा सोडून चालत नाही. त्याला मनगटात ताकद लागते. तोंडात दम असून चालत नाही, मनगटात दम लागतो. तो माझ्या शिवसैनिकांमध्ये आहे, असे एकनाथ शिंदे म्हणाले.

#### किसी ने छेड़ा तो छोड़ते नहीं..

तुम्ही आमच्या नादाला लागू नका. आम्ही तुम्हाला तीन वर्षांपूर्वी दाखवले आहे. आम्ही तुमचे 'टांगा पलटी, घोडे फरार' केलेले आहेत. आमच्या नादाला लागू नका. हा एकनाथ शिंदे बाळासाहेब ठाकरेंचा सच्चा कार्यकर्ता, धर्मवीर आनंद दिघेंचा कार्यकर्ता आहे. बाळासाहेबांनी भाषणात सांगितले आहे, धर्मवीर आनंद दिघेंच्या तालमीतील हे लोक आहेत, हा एकनाथ आहे. आमच्या नादाला कशाला लागता? आम्ही कोणाच्या नादाला लागत नाही. 'हम किसीको छेड़ते नहीं, लेकिन किसी ने हमें छेड़ा तो हम छोड़ते नहीं.' असे आव्हान एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे गटाला दिले.

#### राऊत, दानवे, भास्कर जाधव यांच्याकडून समाचार

उबाठा गटाच्या सोहळ्यामध्ये संजय राऊत, अंबादास दानवे तसेच भास्कर जाधव यांनी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेवर महायुती सरकारवर त्याचप्रमाणे नरेंद्र मोदी सरकारवर जोरदार प्रहार केले. 'ऑपरेशन सिंदूर' चीही त्यांनी टर उडवली. महाराष्ट्र सरकारच्या सर्व योजना फसव्या असून निधी अभावी हे सरकार पूर्णपणे अडचणीत आहे अशी टीकाही त्यांनी केली.

# हिंदी सक्तीचा शिक्षकांनाही फटका!

## हिंदीसाठी स्वतंत्र शिक्षक दिले जाणार नाहीत

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पहिलीपासून हिंदी विषय शिकवण्यासाठी उपलब्ध शिक्षकच पात्र असल्याचे शिक्षण विभागाचे म्हणणे असल्याने हिंदीची सक्ती केवळ विद्यार्थ्यांवरच नाही, तर शिक्षकांवरही होणार आहे. त्याचा ताण येणार असल्याची शिक्षकांची भावना आहे.**




शिक्षण विभागाने तिसऱ्या भाषेसंदर्भातील शासन निर्णयाचे शुद्धिपत्रक मंगळवारी रात्री प्रसिद्ध केले. त्यानुसार राज्य मंडळाशी संलग्न मराठी आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळांत पहिली ते पाचवीसाठी हिंदी ही सर्वसाधारण भाषा असेल, तर हिंदी नको असल्यास काही अटींसह अन्य भारतीय भाषा शिकण्याचा पर्याय आहे. यावरून झालेल्या वादंगानंतर शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात, 'उपलब्ध शिक्षक तांत्रिकदृष्ट्या पात्रता असल्यामुळे हिंदी विषय शिकविण्यासाठी नियुक्त करता येतील.

मात्र, इतर भाषांसाठीची व्यवस्था करावी लागेल,' असे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे हिंदीसाठी स्वतंत्र शिक्षक दिले जाणार नाहीत. तर, इतर भारतीय भाषांसाठी स्वतंत्र शिक्षक देणे विद्यार्थिसंख्येवर अवलंबून असेल, हे स्पष्ट झाले आहे.याबाबत शिक्षणशास्त्राचे अभ्यासक किशोर दरक म्हणाले, 'जे शिक्षक मराठी शिकवतात, तेच हिंदी शिकवू शकतील, या गृहितकात अध्यापनशास्त्रीय विचाराचा अभाव आहे. नव्या वेळापत्रकात ऑनलाइनचा उल्लेखही नसल्याने हिंदीची सक्ती स्पष्ट दिसते. 'राज्य अभ्यासक्रम आराखड्या'त मराठी व हिंदीच्या अभ्यासक्रमाची ध्येये एकसमान असल्याचे म्हटले आहे. मात्र, हिंदीच्या तासिका मराठीच्या निम्म्याच आहेत. याचा अर्थ शिक्षण विभागात कसलाही ताळमेळ नाही. ज्या अभ्यासक्रम आराखड्यामुळे राज्यात गेले वर्षभर शैक्षणिक अस्थिरता निर्माण झाली आहे, तो आराखडा विनाशर्त रद्द करावा.

म्हणजे शिक्षणाशी प्रतारणा करण्याचा आणि लाखो बालकांच्या हक्कांची पायमल्ली करण्याचा दोष महाराष्ट्राला लागणार नाही.'अध्यापनात तिसरी भाषा म्हणून हिंदीच्या समावेशामुळे शिक्षकांवर अतिरिक्त ताण नक्कीच येणार आहे. राज्याच्या भौगोलिक व सामाजिक परिस्थितीचा विचार केल्यास सर्वच ठिकाणी हिंदी विषय मुलांना समजेल, अशी स्थिती नाही. विशेषतः सीमा भागातील आणि आजही बोलीभाषेचा वापर होतो त्या ठिकाणी प्रथम भाषेची कौशल्ये, क्षमता तेथील विद्यार्थी प्राप्त करू शकत नसल्याचे विविध सर्वेक्षणांतून दिसून आले आहे. त्यासाठी शिक्षण विभागातर्फे विविध उपक्रम राबवले जात आहेत. हिंदी विषयाची काठिण्यपातळी इयत्तानिहाय वाढत जाईल. मात्र, विद्यार्थ्यांना अपेक्षित क्षमता प्राप्त करता येईल, असे नाही. त्याशिवाय मराठी माध्यमाचे विद्यार्थी इंग्रजी द्वितीय भाषा म्हणून शिकताना त्यांची आकलन क्षमता कमी असल्याचे दिसून येते,' असे एका शिक्षकाने नाव न छापण्याच्या अटीवर स्पष्ट केले.

### अन्य तासिका कमी कराव्या लागणार

मुख्यतः कोणताही विषय शिकवण्यासाठी स्वतः शिक्षकाला समृद्ध होणे गरजेचे आहे. शालेय स्तरावर विविध शैक्षणिक कामे कमी करण्याची भूमिका वेळोवेळी शिक्षण विभाग मांडत असला, तरी कामे कमी होत नाहीत. तसेच, वेळापत्रक नियोजनात नवीन विषय वाढल्याने शिक्षकांवर अतिरिक्त ताण येणारच आहे. इयत्ता वाढत जाईल तसतसा ताणही वाढत जाईल. हा विषय या पूर्वीच्या वेळापत्रक नियोजनात नसल्याने अन्य विषयांच्या तासिका कमी कराव्या लागणार आहेत. यावरून झालेल्या वादंगानंतर शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात, 'उपलब्ध शिक्षक तांत्रिकदृष्ट्या पात्रता असल्यामुळे हिंदी विषय शिकविण्यासाठी नियुक्त करता येतील.

# आता अंमलबजावणीची घाई

## हिंदीसह भारतीय भाषांचा समावेश असलेले वेळापत्रक जाहीर

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यात मराठी आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये पहिलीपासून तिसरी भाषा म्हणून हिंदी किंवा भारतीय भाषा शिकविण्याचा शासन निर्णय प्रसिद्ध केल्यानंतर एकाच दिवसात तिसऱ्या भाषेचा समावेश असलेले वेळापत्रक आणि विषयनिहाय योजना राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने (एससीईआरटी) जाहीर केली. ऑनलाइन शिकण्याबाबतची पद्धत कशी असणार, याबाबत स्पष्टता नसल्याने वेळापत्रकाची घाई कशासाठी, असा प्रश्न शैक्षणिक वर्तुळातून उपस्थित करण्यात येत आहे.**




मराठी आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये पहिलीपासून तिसरी भाषा म्हणून सर्वसाधारणपणे हिंदी किंवा काही अटींसह अन्य भारतीय भाषांचा पर्याय उपलब्ध करून देणारे शुद्धिपत्रक शालेय शिक्षण विभागाने १७ जून रोजी प्रसिद्ध केले. यामुळे राज्यात हिंदी पहिलीपासून अप्रत्यक्षपणे सक्तीनेच शिकवली जाणार असल्याचे दिसून येत आहे. या निर्णयावर राज्यभर तीव्र प्रतिक्रिया उमटत असताना, शिक्षण विभागाने आता निर्णयाच्या अंमलबजावणीचे पाऊल उचलले आहे.इयत्ता पहिलीसाठी नवा अभ्यासक्रम लागू झाल्याने 'एससीईआरटी'चे संचालक राहुल रेखावार यांनी सुधारित विषययोजना, तासिका विभागणी आणि वेळापत्रकाबाबतचे परिपत्रक गुरुवारी प्रसिद्ध केले. त्यानुसार, मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये मराठी (स्तर १), इंग्रजी (स्तर २), हिंदी किंवा इतर भारतीय भाषा, गणित, कलाशिक्षण, आरोग्य व शारीरिक शिक्षण, कार्यशिक्षण, तर इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये इंग्रजी (स्तर १), मराठी (स्तर २), हिंदी किंवा इतर भारतीय भाषा, गणित, कलाशिक्षण, आरोग्य व शारीरिक शिक्षण, तर अन्य माध्यमांच्या शाळांमध्ये हिंदी, ऊर्दू, कन्नड, गुजराती, तमिळ, तेलुगू, सिंधी, बंगाली यापैकी माध्यम भाषा (स्तर १), इंग्रजी (स्तर २), मराठी (अन्य माध्यमांसाठी), गणित, कलाशिक्षण, आरोग्य व शारीरिक शिक्षण असे विषय असणार आहेत. स्काउट-गाइड हा विषय ऐच्छिक असणार आहे.विषययोजना, वेळापत्रकाबाबतचे निर्देश इयत्ता पहिलीसाठी शैक्षणिक वर्ष २०२५-२६पासून अंमलात येतील. इयत्ता दुसरीसाठी नवीन पाठ्यपुस्तके लागू झाल्यावर निर्देश बंधनकारक राहतील. तासिकेच्या क्रमवारीमध्ये, शाळा सुरू करण्याच्या वेळेमध्ये शाळांना बदल करता येतील. मात्र, विषयनिहाय अध्ययन-अध्यापनाचा साप्ताहिक आणि वार्षिक घड्याळी तासांचा कालावधी कोणत्याही विषयासाठी शाळास्तरावर कमी करता येणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे.राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्यानुसार वार्षिक ९९० तास अध्ययन होणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने शालेय कामकाज आता २३७ दिवस होणार आहे.

### शालेय कामकाज 237 दिवस

मराठी आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये पहिलीपासून तिसरी भाषा म्हणून सर्वसाधारणपणे हिंदी किंवा काही अटींसह अन्य भारतीय भाषांचा पर्याय उपलब्ध करून देणारे शुद्धिपत्रक शालेय शिक्षण विभागाने १७ जून रोजी प्रसिद्ध केले. यामुळे राज्यात हिंदी पहिलीपासून अप्रत्यक्षपणे सक्तीनेच शिकवली जाणार असल्याचे दिसून येत आहे.

# भाजपा- राष्ट्रवादीत वादाची ठिणगी!

## राष्ट्रवादीचे प्रवक्ते उमेश पाटील : आमदार महेश लांडगे यांना खणखणीत प्रतिवाद

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवडच्या राजकीय आखाड्यात सध्या तापलेलं वातावरण अधिकच चिघळत चाललं असून, भाजप आमदार महेश लांडगे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यातील अप्रत्यक्ष संघर्षाने आता अधिक तीव्र व खुले रूप धारण केलं आहे. "तुम्हाला अजितदादांनी संधी दिली हे विसरु नका... " असा इशारा राष्ट्रवादीचे प्रवक्ते उमेश पाटील यांनी दिला आहे.**




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आयोजित कार्यक्रमात आमदार महेश लांडगे यांनी "मी पैलवान आहे, कोणालाही घाबरत नाही," अशी थेट आणि आक्रमक भूमिका घेत अप्रत्यक्षपणे उपमुख्यमंत्री अजित पवारांनाच कुस्तीचं आव्हान दिलं. या वक्तव्यावर आता प्रतिक्रिया उमटू लागल्या असून, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश प्रवक्ते उमेश पाटील यांनी या विधानाचा जाहीर समाचार घेत सडकून प्रतिउत्तर दिलं आहे. उमेश पाटील यांनी पिंपरी-चिंचवडमध्ये पत्रकार परिषद घेत लांडगे यांना उद्देशून जोरदार प्रतिक्रिया दिली. त्यांनी म्हटले – "तुमचा वस्ताद अजितदादा आहे. आणि त्यांनीचं तुम्हाला लंगोट घालायला शिकवलं, तेंव्हा कुठं तुम्ही पैलवान झाला हे विसरु नका..! वस्ताद शेवटी एक डाव राखून ठेवतो, हे लक्षात ठेवा."

या विधानाने पिंपरी-चिंचवडमधील राजकीय वातावरणात खळबळ उडाली असून, भाजप आणि राष्ट्रवादीमधील सत्तासंघर्ष अधिक उघड होऊ लागला आहे. यापूर्वी अजित पवारांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील भाजपच्या कारभारातील कथित भ्रष्टाचारावर बोट ठेवत कठोर भाष्य केलं होतं. त्याच्या दुसऱ्याच दिवशी आमदार लांडगे यांनी मुख्यमंत्र्यांसमोर "मी अंगावर घेण्यास तयार आहे" अशी भाषा वापरली, ज्यावर खुद्द फडणवीसांनी "ये पब्लिक है, सब जानती है" असा सल्ल्याचा टोन वापरला होता.

वस्ताद शेवटी कोण ठरेल, हे मात्र मतदारच ठरवतील "तुम्हाला पैलवान बनवलं ते कोण?" असा थेट सवाल करत उमेश पाटील यांनी महेश लांडगे यांची राजकीय जडणघडण अजित पवारांच्या नेतृत्वाखाली झाली, हे सहजपणे अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला. या साऱ्या पार्श्वभूमीवर येणाऱ्या महापालिका निवडणुका आणि महायुतीतील अंतर्गत घुसमट या दोन्ही मुद्द्यांवर गंभीर चर्चा रंगू लागली आहे. लवकरच या संघर्षाचे प्रतिबिंब निवडणूक रिंगणातही दिसून येईल, अशी राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे.राजकीय कुस्तीच्या आखाड्यात सध्या दोन्ही बाजूंनी डाव-पेच टाकले जात आहेत. मात्र वस्ताद शेवटी कोण ठरेल, हे मात्र मतदारच ठरवतील, असेही उमेश पाटील यांनी म्हटले आहे.

> महायुतीमध्ये प्रत्येक नेत्याने बोलताना तारतम्य पाळले पाहिजे. महाराष्ट्राचे नेतृत्व करण्याची क्षमता अजित पवार यांच्यात आहे म्हणूनच मोदी-शहांनी त्यांना सोबत घेतले. भोसरीच्या आमदारांनी ही बाब लक्षात घेतली पाहिजे.
> -उमेश पाटील, प्रवक्ते राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी.

### महेश लांडगेंची भाषा तमाशातील फडासारखी

चिखली येथे झालेल्या संत पिठाच्या उद्घाटनाप्रसंगी आमदार महेश लांडगे यांनी अप्रत्यक्षपणे अजित पवारांना इशारा दिला, "मी पैलवान आहे, अंगावर घ्यायची सवय आहे." असे अप्रत्यक्षपणे अजित पवारांना सूचित केले होते. यावर आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश प्रवक्ते उमेश पाटील यांनी पत्रकार परिषद घेऊन प्रत्युत्तर दिले. संत पिठाच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमात आमदार महेश लांडगे यांची भाषा अत्यंत चुकीची असल्याचं उमेश पाटील यांनी म्हटल आहे. उद्घाटनाच्या कार्यक्रमात ज्या भाषेत बोलायला पाहिजे होतं, ते न करता एखाद्या तमाशाच्या फडाच उद्घाटनात वापरण्यात येणारी भाषा वापरली. महेश लांडगे यांच्या वक्तव्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सुद्धा मान खाली घालायला लावली आहे. महेश लांडगे यांच्या वक्तव्यामुळे महायुतीमध्ये तेढ निर्माण होण्याचं काही कारण नाही. वैयक्तिक पातळीवर जाऊन बोलल्यानंतर याचा पक्षावर काही परिणाम होत नाही.

---

# माजी महापौर संजोग वाघेरे स्वगृही परतणार!

## अजित गव्हाणे : उपमुख्यमंत्री पवार यांची महापालिका निवडणुकीसाठी मोर्चेबांधणी

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पिंपरी-चिंचवडचे माजी महापौर संजोग वाघेरे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत (अजित पवार गट) स्वगृही परतणार आहेत. त्यामुळे 'उबाठा'ला मोठा धक्का बसण्याची शक्यता आहे. आगामी महापालिका निवडणुकीच्या निमित्ताने राष्ट्रवादीने जोरदार मोर्चेबांधणी केली असून, खरी लढत "भाजपा विरुद्ध राष्ट्रवादी" मध्ये होणार असे चित्र स्पष्ट झाले आहे.**




भोसरी येथे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीमध्ये माजी नगरसेवक अजित गव्हाणे आणि 37 माजी नगरसेवकांचा पक्षप्रवेश नुकताच झाला. यावेळी माजी आमदार विलास लांडे, माजी विरोधी पक्षनेते नाना काटे यांच्यासह प्रमुख नेत्यांची उपस्थिती होती. कार्यक्रमामध्ये बोलताना अजित गव्हाणे यांनी "माजी महापौर संजोग वाघेरे यांनीही अजितदादांची भेट घेतली आहे. त्यामुळे तेसुद्धा आपल्यासोबत स्वगृही येण्याच्या तयारीत आहेत" असा दावा केला आहे.

माजी महापौर संजोग वाघेरे यांचे ओळख पवार कुटुंबियांचे निकटवर्ती अशी आहे. पिंपरी-चिंचवड शहराच्या राजकारणामध्ये माजी महापौर कै. भिकू वाघेरे यांच्यानंतर संजोग वाघेरे, त्यांच्या पत्नी उषा वाघेरे आणि आता मुलगा ऋषिकेश वाघेरे राजकारणात सक्रीय आहेत.


2022 मध्ये राष्ट्रवादीत मोठी फुट पडली. त्यावेळी संजोग वाघेरे यांनी अजित पवार यांच्यासोबत राहणे पसंत केले. लोकसभा निवडणुकीपूर्वी मावळ लोकसभा मतदार संघातून वाघेरे यांनी निवडणूक लढवण्याची तयारी केली. मात्र, हा मतदार संघ महायुतीच्या जागावाटपामध्ये शिवसेना शिंदे गटाकडे गेला. त्यामुळे वाघेरे यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला आणि "मशाल" चिन्हावर निवडणूक लढवली. निवडणुकीत वाघेरे यांचा पराभव झाला.

### अजित पवार गट मजबूत होतोय...

दरम्यान, आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी अजित पवार गटाने मोर्चेबांधणी सुरू केली असून, आजी-माजी पदाधिकाऱ्यांची मोट बांधण्यात येत आहे. भोसरीतील कार्यक्रमात 37 माजी नगरसेवकांनी 'तुतारी'तून बाहेर पडत 'घड्याळ' हातावर बांधले. त्यानंतर माजी महापौर वाघेरे यांचाही परतीचा प्रवास सुरू झाला आहे. लवकरच वाघेरे अजित पवार गटात दाखल होतील, असा दावा केला जात आहे. परिणामी, विधानसभा निवडणुकीपूर्वी मोठ्याप्रमाणात पडझड झालेला राष्ट्रवादी अजित पवार गट आता मजबूत होताना दिसत आहे.

> पवार आणि वाघेरे कुटुंबियांचे दोन पिढ्यांचे ऋणाणुबंध कायम आहेत. बदललेल्या राजकीय समीकरणांमुळे आम्ही लोकसभा निवडणुकीत वेगळा विचार केला होता. राष्ट्रवादीत स्वगृही परतण्याबाबत अद्याप काही निर्णय झालेला नाही. कुंडमळा येथील दुर्घटनेची पाहणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली. मावळ मतदार संघातून मी निवडणूक लढवली आहे. त्यामुळे मीही त्या ठिकाणी उपस्थित होतो. भविष्यकाळात शहराच्या विकासासाठी काम करण्याची भूमिका आहे.
> –संजोग वाघेरे, माजी महापौर, पिंपरी-चिंचवड.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### 'मी कोणीतरी आहे' ही वृत्ती घातक.

पुष्कळ लोकांच्या अडचणी ऐकून असा विचार मनात आला, की जगातल्या सर्व दु:खांचे मूळ, देहदु:ख आणि पैशाची टंचाई ह्यांत मुख्यत: साठविलेले आहे. या दोन्ही गोष्टींत जर मदत करता आली तर पुष्कळ लोकांना सुखी करता येईल असे वाटू लागले, आणि त्या दृष्टीने विचार सुरू झाला. पैशाचा विचार करता असे दिसले की, आपण लंगोटी घातलेली, जवळ पैसा नाही, आणि त्याचा लोभही नाही. आता दुसऱ्याला पैसा द्यायचा म्हटले, म्हणजे त्याचा प्रथम आपल्या ठिकाणी लोभ उत्पन्न केला पाहिजे, तरच तो मिळवावा अशी बुद्धी उत्पन्न होईल; नंतर पैसे मिळविणे, आणि त्याच्यानंतर तो गरजवंताला देणे. पण हे करणे वाटते तितके सोपे नाही. कारण दुसऱ्याला देण्याकरिता पैसा मिळवावा म्हणून जो लोभ प्रथम आपल्या ठिकाणी उत्पन्न केला, तोच पैसा सोडताना आपल्या आड येईल, आणि दुसऱ्याला पैसा देण्याची बुद्धी मारील. म्हणजे परिणाम असा होणार की, दुसऱ्याला पैसा तर देता आला नाहीच, पण आपल्या ठिकाणी मात्र आधी नसलेला पैशाचा लोभ उत्पन्न झाला. ह्यात दुसऱ्याचे काम तर नाहीच, आणि स्वत:चे मात्र नुकसान झाले. दुसरी बाब देहदु:खाची. ज्याची देहबुद्धी मेलेली आहे, त्याला दुसऱ्याच्या देहदु:खाची जाणीव होऊ शकत नाही. म्हणजे, दुसऱ्याचे देहदु:ख नाहीसे करावे अशी बुद्धी होण्याकरिता स्वत:च्या ठिकाणी देहबुद्धी जागृत करावी लागेल. समजा, इतके केले, आणि दुसऱ्याचे देहदु:ख निवारले, तरी त्याला पुन: देहदु:ख भोगावे लागणारच नाही असे कसे होईल? आज झालेली पोटदुखी बंद केली तरी कालांतराने त्याला ताप किंवा इतर आजार येणारच नाही असे कसे होऊ शकेल? म्हणजे देहदु:ख कायमचे टाळता येत नाही, आणि पैसाही देता येत नाही. अशाने जगाला सुखी तर करता येत नाहीच, पण आपल्या स्वत:च्या ठिकाणी मात्र नसते दोष उत्पन्न केल्यामुळे स्वत:ची अवनती केल्यासारखे होऊन, नुकसान मात्र पदरात पडते. म्हणून रामाची प्रार्थना केली की, असल्या गोष्टी करण्याची शक्ती आणि बुद्धी मला देऊ नकोस. बालपणाची सरल वृत्ती नाहीशी व्हायला दोन मोठी कारणे आहेत. एक पैसा, आणि दुसरे विद्या. दोन्हींपासून 'मी कुणीतरी श्रेष्ठ आहे' ही वृत्ती उत्पन्न होते, आणि ती घातक असते. 'मी कुणीतरी आहे' असे वाटण्यापेक्षा 'मी कुणाचा तरी आहे' असे वाटणे हिताचे आहे. जगातले अत्याचार, अनीती, अधर्म, असमाधान या सर्वांचे कारण हेच की, मनुष्य जास्त लोभी झाला आहे. देवाची ज्याच्यावर कृपा आहे त्याला तो पोटापुरता पैसा देतो.

**बोधवचन: आपल्याला हव्या त्या गोष्टी देण्यामध्ये भगवंताची खरी कृपा नसून, असेल त्या परिस्थितीमध्ये आपले समाधान टिकणे ही त्याची खरी कृपा होय.**



## 'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

# लाडक्या बहिणी जोमात, 'महायुती' मात्र कोमात !



**एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना राज्यातील माता-भगिनींसाठी एक आदर्शवत् अशी योजना त्यांनी आणली होती. अर्थात् तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजितदादा पवार यांनी देखील या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला क्षणात मंजुरी दिली.. पुण्यातील बालेवाडी येथे एका दिमाखदार सोहळ्यात हा प्रकल्प 'लॉन्च' झाला. सर्व पात्र महिलांना सरकारतर्फे दरमहा १५०० रुपये देण्याचा हा प्रकल्प लोकप्रियतेच्या सर्वोच्च शिखरावर पोहोचला आणि विधानसभा निवडणुकीत 'महायुती' प्रचंड बहुमताने सत्तेवर आली..**

### लाडक्या बहिणींचा बोजा परवडेना..

'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना' ज्यासाठी आखली गेली होती, ते ध्येय मात्र शंभर टक्के साध्य झाले आणि दोन तृतीयांश बहुमत 'महायुती' ला मिळाले. नंतर देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली 'महायुती' चा कारभार सुरू झाला. पण, आता बदललेल्या परिस्थितीत हा लाडक्या बहिणींचा बोजा सरकारला परवडेना झाला आहे की काय, अशी परिस्थिती आली असून सरकारची आर्थिक स्थिती चिंताजनक बनू लागली आहे, हे सर्वांच्याच लक्षात आले आहे.

### महाराष्ट्रावर कर्जाचा बोजा किती?

सध्या महाराष्ट्रावर एकूण कर्जाचा बोजा तब्बल ₹ 9.3 लाख कोटी रुपयांपर्यंत पोहचला आहे, जो गेल्या दहा वर्षांत तीनपट वाढला आहे. हे कर्ज राज्याच्या एकूण उत्पन्नाच्या सुमारे १८.५ टक्के आहे. थोडक्यात काय, प्रत्येक नागरिकाच्या डोक्यावर सरासरी ५० हजार रुपयांचे कर्ज आहे. कर्जाचा हा बोजा वाढण्यामागे निवडणुकीपूर्वी जाहीर केलेल्या योजना जसे की लाडकी बहीण, आणि विविध सरकारी अनुत्पादक वायफळ खर्च कारणीभूत आहेत, असे आर्थिक तज्ज्ञांना वाटत आहे.

### लाडक्या बहिणींमुळे आर्थिक ताण !

लाडकी बहीण योजनेमुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेवर मोठा ताण आला आहे आणि राज्याच्या तिजोरीवर वार्षिक ५७/५८ हजार कोटींचा अतिरिक्त भार पडत आहे. या योजनेसाठी आतापर्यंत आदिवासी आणि सामाजिक न्याय विभागाचा सुमारे १,८२७ कोटी रुपये निधी वळवण्यात आला आहे. आदिवासी विभागाचा तीनदा ३३५ कोटी आणि सामाजिक न्याय विभागाचा दोनदा ४१० कोटींचा निधी समाविष्ट आहे. यामुळे आदिवासी, दलित, सामाजिक न्याय, आणि इतर कल्याणकारी योजनांमध्ये निधी कमी मिळत असल्याचे चित्र आहे. साहजिकच, त्यामुळे त्या विभागातील अनेक कामे रखडली आहेत आणि गरजू घटकांना थेट फटका बसत असल्याचे मान्य करावेच लागेल.

### पाहू या कामे कुणाची रखडली..

हा निधी वळवल्यामुळे नेमकी कोणाची कामे रखडली हे पाहणे महत्त्वाचे आहे. पहिला आदिवासी विकास विभाग : शाळा, वसतीगृहे, आरोग्य सुविधा आणि पाणीपुरवठा प्रकल्पांसाठी निधी कमी मिळाला आहे. दुसरा, सामाजिक न्याय विभाग : दलित आणि मागासवर्गीयांसाठीच्या शिष्यवृत्ती, वसतीगृहे, आणि कल्याणकारी योजनांमध्ये निधीची कमतरता जाणवते, हे नक्की! तिसरा, महिला व बालकल्याण विभाग : काही महिला सक्षमीकरण, पोषण आणि बालकल्याण योजना थांबल्या किंवा संथ झाल्या आहेत, असे कागदोपत्री तरी दिसत आहे. अशा प्रकारच्या निधी फिरवा-फिरवीमुळे या विभागातील अनेक गरजू लाभार्थ्यांना थेट नुकसान होत आहे.

### योजनेत गैरव्यवहार..

'महायुती' ने लाडकी बहीण योजना राबवली खरी, पण त्यात मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याचे नंतर लक्षात आले आहे. २,६५२ सरकारी महिला कर्मचाऱ्यांनी या योजनेचा गैरफायदा घेतला, ज्यामुळे सरकारला ३.५८ कोटींचा फटका बसला. या कर्मचाऱ्यांकडून पैसे वसूल करण्याची प्रक्रिया सुरू असली तरी गैरव्यवहार हा झालेला आहेच. अनेक प्रकार फसवणुकीचे झाले आहेत. मुंबईत काही जणांनी गरीब लोकांची बँक खाती उघडून, ती सायबर गुन्हेगारांना विकली आणि मनी लॉंड्रिंगसाठी वापरली. या प्रकरणात तीन जणांना अटक झाली असून, कोट्यवधी रुपयांचे व्यवहार या खात्यांतून झाले असल्याचे निष्पन्न झाले आहे.

### योजनेतील अनियमिततेचा फटका..

नंतर तपासणी मध्ये पाच लाख महिलांना अयोग्य ठरवण्यात आले. वय, उत्पन्न आणि इतर निकष न पाळता लाभ दिला गेला. अशातच, काही परदेशी नागरिकांनाही लाभ मिळाल्याचे उघड झाले आहे.

### चक्क बांगलादेशी महिलांना लाभ..

•लाडकी बहीण योजनेत परदेशी नागरिक, विशेषतः बांगलादेशी महिलांना लाभ मिळाल्याचे गंभीर प्रकरण समोर आले आहे. मुंबईत पाच बांगलादेशी महिलांनी बनावट कागदपत्रे वापरून या योजनेचा लाभ घेतला. या प्रकरणात बनावट ओळखपत्रे, पत्ते आणि बँक खात्यांचा वापर करून सरकारी निधी मिळवण्यात आला. राज्य सरकारच्या यंत्रणा याला सामील असू शकतात आणि अशा बोगस लाभार्थ्यांची व्याप्ती राज्यभर असू शकते, हे लक्षात घ्यायला हवे.

### पैसे परत मिळवण्यासाठी..

आता मात्र, 'महायुती' सरकारकडून अशा फसवणुकीवर लक्ष ठेवण्यासाठी आणि पैसे परत मिळवण्यासाठी विशेष मोहीम राबवली जात आहे. अपात्र लाभार्थ्यांकडून पैसे परत घेण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. महिला व बालविकास विभागाने यासाठी खास विभाग तयार केला असून, अनेक महिलांनी पैसे परत करायला सुरुवात केली आहे.

### पाच लाख अपात्र महिला..

या योजनेत सुमारे पाच लाख अपात्र महिलांना एकूण ४५० कोटी रुपये वाटप झाले आहे. पण, ही रक्कम परत घेण्यात आलेली नाही. गुन्हे दाखल करण्याबाबत सरकारकडून सूचना दिल्या असल्या तरी, नेमक्या गुन्ह्यांची संख्या जाहीर करण्यात आलेली नाही. तीस लाख महिलांवर अपात्रतेसाठी तपास सुरू आहे आणि बोगस कागदपत्रांवर लाभ घेतल्यास गुन्हे दाखल केले जात आहेत. नेमका आकडा लवकरच पुढे येईल !

### निधी कसा उभा करणार ?

लाडक्या बहिणींना देण्यात येणारी रक्कम अचानक थांबविणे सरकारला परवडणारे नाही. सरकारने फसवणूक केली असा मोठा आळ येऊ शकतो. त्यामुळे हा वाढलेला खर्च कशा पद्धतीने भरून काढणार ही सरकार पुढील मोठी डोकेदुखी आहे. अन्य खात्यांचा निधी या योजनेसाठी वळवणे हे देखील चुकीचे आहे. सध्या मात्र लाडक्या बहिणींनी सरकारचे डोके चांगलेच फिरवले असून, त्यावर तोडगा कसा निघतो हे पाहणे महत्त्वाचे आहे, हे नक्की !

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव. (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# दुष्काळ निवारणासाठी 5 जिल्ह्यांची निवड!

## एकूण दहा तालुक्यातील 90 गावांचा या प्रकल्पात समावेश

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**केंद्राच्या राष्ट्रीय आपत्ती निवारण निधी अंतर्गत विज्ञान आधारीत दुष्काळ निवारण प्रकल्प राबविण्यात येणार आहे. या प्रायोगिक प्रकल्पासाठी राज्यातील सातारा, अहिल्यानगर, नाशिक, धुळे व लातूर या पाच जिल्ह्यांतील प्रत्येकी दोन, अशा दहा तालुक्यांतील ९० गावांचा समावेश करण्यात आला आहे. हा प्रकल्प राबविण्यासाठी १७४ कोटींच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे.**



देशातील बारा राज्यांत सर्वाधिक दुष्काळ पडतो. या राज्यांमध्ये राष्ट्रीय आपत्ती निवारण निधीच्या उपयोगासंबंधी मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करण्यात आली आहेत. दुष्काळाच्या काळात तग धरून राहण्याची क्षमता वाढविणे आणि ग्रामीण उपजीविका सुधारणे हे राष्ट्रीय दुष्काळ निवारण प्रकल्पाचे मुख्य उद्दिष्ट आहे. दुष्काळ निवारण करण्यासाठी विज्ञान-आधारित दृष्टिकोन वापरणारा हा देशातील पहिला प्रकल्प असल्याचा दावा शासनाने केला आहे.या राष्ट्रीय दुष्काळ निवारण प्रकल्पामध्ये राज्यातील सातारा, अहिल्यानगर, नाशिक, धुळे व लातूर या पाच जिल्ह्यांची निवड करण्यात आली आहे. पर्जन्यमान, दुष्काळाची वारंवारता, दुष्काळ प्रवण क्षेत्र आदी बाबी विचारात घेऊन या जिल्ह्यांची निवड करण्यात आली आहे. प्रत्येक जिल्ह्यातील दोन तालुके असे एकूण दहा तालुक्यातील ९० गावांचा या प्रकल्पात समावेश करण्यात आला आहे. या प्रकल्पासाठी १७४ कोटींचा खर्च अपेक्षित आहे. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी गाव, क्लस्टर, जिल्हा आणि राज्य पातळीवर समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यातील राज्य आणि जिल्हा स्तरावरील समितीची कार्यकक्षा निश्चित करण्यात आली आहे. या समित्या दर सहा महिन्याला कामांच्या प्रगतीचा आढावा घेणार आहेत.राज्यस्तरीय सुकाणू समितीत कृषी विभागाचे प्रधान सचिव अध्यक्ष असतील, मदत व पुनर्वसन विभागाचे प्रधान सचिव, राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे संचालक, राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे प्रतिनिधी आणि तांत्रिक संस्थेच्या प्रतिनिधींचा सदस्य म्हणून आणि कृषी आयुक्तांचा सदस्य सचिवांचा म्हणून समावेश आहे. जिल्हास्तरीय समितीत जिल्हाधिकारी अध्यक्ष असून, देशातील बारा राज्यांत सर्वाधिक दुष्काळ पडतो. या राज्यांमध्ये राष्ट्रीय आपत्ती निवारण निधीच्या उपयोगासंबंधी मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करण्यात आली आहेत. दुष्काळाच्या काळात तग धरून राहण्याची क्षमता वाढविणे आणि ग्रामीण उपजीविका सुधारणे हे राष्ट्रीय दुष्काळ निवारण प्रकल्पाचे मुख्य उद्दिष्ट आहे. दुष्काळ निवारण करण्यासाठी विज्ञान-आधारित दृष्टिकोन वापरणारा हा देशातील पहिला प्रकल्प असल्याचा दावा शासनाने केला आहे.या राष्ट्रीय दुष्काळ निवारण प्रकल्पामध्ये राज्यातील सातारा, अहिल्यानगर, नाशिक, धुळे व लातूर या पाच जिल्ह्यांची निवड करण्यात आली आहे. पर्जन्यमान, दुष्काळाची वारंवारता, दुष्काळ प्रवण क्षेत्र आदी बाबी विचारात घेऊन या जिल्ह्यांची निवड करण्यात आली आहे. प्रत्येक जिल्ह्यातील दोन तालुके असे एकूण दहा तालुक्यातील ९० गावांचा या प्रकल्पात समावेश करण्यात आला आहे. या प्रकल्पासाठी १७४ कोटींचा खर्च अपेक्षित आहे. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी गाव, क्लस्टर, जिल्हा आणि राज्य पातळीवर समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यातील राज्य आणि जिल्हा स्तरावरील समितीची कार्यकक्षा निश्चित करण्यात आली आहे.

### दुष्काळ निवारण प्रकल्प


या समित्या दर सहा महिन्याला कामांच्या प्रगतीचा आढावा घेणार आहेत.राज्यस्तरीय सुकाणू समितीत कृषी विभागाचे प्रधान सचिव अध्यक्ष असतील, मदत व पुनर्वसन विभागाचे प्रधान सचिव, राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे संचालक, राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे प्रतिनिधी आणि तांत्रिक संस्थेच्या प्रतिनिधींचा सदस्य म्हणून आणि कृषी आयुक्तांचा सदस्य सचिवांचा म्हणून समावेश आहे. जिल्हास्तरीय समितीत जिल्हाधिकारी अध्यक्ष असून, सर्व उप विभागीय अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकारणाचे प्रमुख सदस्य असणार आहेत.केंद्राच्या राष्ट्रीय आपत्ती निवारण निधी अंतर्गत विज्ञान आधारीत दुष्काळ निवारण प्रकल्प राबविण्यात येणार आहे.

# भाजपाचं सरकार आल्यापासून पणवती लागली

## दुर्घटनांची यादी वाचत उद्धव बाळासाहेब ठाकरेंची टीका

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचा ५९ वा वर्धापनदिन सोहळा आज मुंबईतील षण्मुखानंद सभागृहात पार पडला. शिवसेनेच्या दोन्ही गटांचा वर्धापनदिन साजरा होत असताना उद्धव ठाकरे यांनी भाजपा आणि शिंदे गटावर टीका केली.**



आगामी महानगरपालिका, नगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्ष संभाव्य युती-आघाडीची चाचपणी करत आहेत. तसेच इतर पक्षातील नेत्यांना स्वतःकडे खेचण्याचा प्रयत्न करत आहेत. या राजकारणावर उद्धव ठाकरेंनी टीका केली. राजकारणात ज्यांना मुलं होत नाहीत, ते दुसऱ्यांची मुलं चोरतात. भाजपा पक्ष असाच आहे, असे ते म्हणाले. तसेच राज ठाकरे आणि आपली युती होऊ नये, यासाठी काही लोक प्रयत्न करत असल्याचाही आरोप त्यांनी केला. केंद्रात आणि राज्यात भाजपाचं सरकार आल्यापासून पणवती लागली, असेही उद्धव ठाकरे म्हणाले. "कुठे विमानातळचं छत गळतंय, मेट्रो स्थानकात पाणी शिरतंय, प्रयागराजला माणसं चेंगरून मेली, दिल्ली स्थानकावर चेंगराचेंगरी होऊ माणसं दगावली तरी याची जबाबदारी कुणीही घेतली नाही. कालपरवा विमान अपघात झाला, रेल्वेचा अपघात झाला. माणसं गेली, त्याचीही जबाबदारी कुणी घेतली नाही", अशी टीका ठाकरे यांनी केली. आज देशाला पंतप्रधान आणि गृहमंत्री नाही, असेही ते म्हणाले. "देशाला पंतप्रधान नाही, पंतप्रधान भाजपाचे आहेत. देशाला गृहमंत्र्यांची गरज आहे, घरफोड्या अमित शाहांची नाही. संरक्षण मंत्र्यांची गरज आहे, गुंडांना संरक्षण देणाऱ्या राजनाथ सिंहांची गरज नाही", असा आरोप ठाकरे यांनी केला.उद्धव ठाकरे म्हणाले, "राजकारणात ज्यांना मुलं होत नाहीत, अशी लोक आमच्या घराण्यावर टीका करत आहेत. अशा लोकांची कीव येते. भारतीय जनता पक्ष असाच आहे. शिवसेना पक्षप्रमुख असते तर आज त्यांच्यासाठी वेगळा शब्द वापरला असता. त्यांना आजवर कधी मुलं झाली नाहीत, त्यामुळं ते दुसऱ्यांची मुलं स्वीकारत आले.

### देशाला पंतप्रधान, गृहमंत्रीच नाही

ज्या सरदार वल्लभभाई पटेल यांनी संघावर बंदी आणली होती. त्याच वल्लभभाई पटेल यांचा जगातला सर्वात उंच पुतळा बांधण्याची वेळ यांच्यावर आली. हे लोक आता आपल्याला शिकवत आहेत, असंही उद्धव ठाकरे म्हणाले.आगामी महानगरपालिका, नगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्ष संभाव्य युती-आघाडीची चाचपणी करत आहेत. तसेच इतर पक्षातील नेत्यांना स्वतःकडे खेचण्याचा प्रयत्न करत आहेत. या राजकारणावर उद्धव ठाकरेंनी टीका केली. राजकारणात ज्यांना मुलं होत नाहीत, ते दुसऱ्यांची मुलं चोरतात. भाजपा पक्ष असाच आहे, असे ते म्हणाले. तसेच राज ठाकरे आणि आपली युती होऊ नये, यासाठी काही लोक प्रयत्न करत असल्याचाही आरोप त्यांनी केला.केंद्रात आणि राज्यात भाजपाचं सरकार आल्यापासून पणवती लागली.

# इराणवर हल्ला करण्याचा विचारही करू नका!

## जर अमेरिकेने इस्रायलला थेट लष्करी मदत दिली

।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेला इराण-इस्रायल यांच्यातील लष्करी संघर्ष आता आणखी तीव्र होताना दिसत आहे. अशा परिस्थितीत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड यांनी इराणवर हल्ला करण्याचे संकेत दिले होते. यावर आता रशियाने अमेरिकेला कडक इशारा दिला असून, इराणविरुद्धच्या लष्करी कारवाईत इस्रायलला पाठिंबा देऊ नये, असे सांगितले आहे.**



रशियाचे उपपरराष्ट्रमंत्री सर्गेई रियाबकोव्ह नुकतेच म्हणाले की, जर अमेरिकेने इस्रायलला थेट लष्करी मदत दिली, तर मध्य पूर्वेतील परिस्थिती आणखी बिकट होऊ शकते. अशा मदतीचा विचार करणेही धोकादायक ठरू शकते, असे त्यांनी सांगितले.“हे असे पाऊल असेल, जे संपूर्ण परिस्थिती पूर्णपणे अस्थिर करेल,” असे रियाबकोव्ह यांनी रशियन वृत्तसंस्था इंटरफॅक्सला सांगितले. यावेळी त्यांनी स्पष्ट केले की, रशिया आणि अमेरिका संपर्कात असून, इराण-इस्रायल संघर्षाबाबत चर्चा सुरू आहे.गेल्या शुक्रवारीपासून, इस्रायलने इराणच्या अणुस्थळांवर तसेच काही शास्त्रज्ञ आणि वरिष्ठ लष्करी नेत्यांवर हवाई हल्ले करण्यास सुरुवात केली आहे. दरम्यान, रशियाने या हल्ल्यांना सुरुवातीपासूनच विरोध केला आहे. प्रत्युत्तरादाखल, इराणनेही गेल्या काही दिवसांपासून इस्रायली शहरांवर क्षेपणास्त्रे आणि ड्रोन डागले आहेत. यामुळे या प्रदेशात धोकादायक परिस्थिती निर्माण झाली आहे. दोन्ही देश एकमेकांवर सातत्याने हल्ले करत आहेत.रशियाच्या परराष्ट्र मंत्रालयाने असा इशाराही दिला आहे की, इस्रायलकडून इराणच्या अणु प्रकल्पांवर होत असलेल्या हल्ल्यांमुळे हा प्रदेश आपत्तीच्या अगदी जवळ आला आहे, “आपत्तीपासून फक्त काही मिलिमीटर दूर.”इस्रायलने इराणमधील बुशेहर अणुऊर्जा प्रकल्पावर केलेले हवाई हल्ले तात्काळ थांबवावेत, असे आवाहन रशियाच्या परराष्ट्र खात्याने केले आहे. या प्रकल्पात रशियन तज्ज्ञ कार्यरत आहेत. बुशेहर हा इराणमधील एकमेव कार्यरत अणुऊर्जा प्रकल्प आहे. या ठिकाणी रशियन इंधन वापरण्यात येते. अण्वस्त्र प्रसाराचा धोका टाळण्यासाठी वापरानंतर रशिया इंधन परत घेते.इस्रायल इराण संघर्षात अमेरिकेने उडी घेऊ नये असे रशियाच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्या मारिया झाखारोव्हा यांनी म्हटले आहे. तसे झाल्यास गंभीर परिणाम होतील असा धमकीवजा इशाराही रशियानं दिला आहे. रशियाचे उपपरराष्ट्रमंत्री सर्गेई रियाबकोव्ह नुकतेच म्हणाले की, जर अमेरिकेने इस्रायलला थेट लष्करी मदत दिली, तर मध्य पूर्वेतील परिस्थिती आणखी बिकट होऊ शकते. अशा मदतीचा विचार करणेही धोकादायक ठरू शकते, असे त्यांनी सांगितले.“हे असे पाऊल असेल, जे संपूर्ण परिस्थिती पूर्णपणे अस्थिर करेल,” असे रियाबकोव्ह यांनी रशियन वृत्तसंस्था इंटरफॅक्सला सांगितले. यावेळी त्यांनी स्पष्ट केले की, रशिया आणि अमेरिका संपर्कात असून, इराण-इस्रायल संघर्षाबाबत चर्चा सुरू आहे.गेल्या शुक्रवारीपासून, इस्रायलने इराणच्या अणुस्थळांवर तसेच काही शास्त्रज्ञ आणि वरिष्ठ लष्करी नेत्यांवर हवाई हल्ले करण्यास सुरुवात केली आहे. दरम्यान, रशियाने या हल्ल्यांना सुरुवातीपासूनच विरोध केला आहे. प्रत्युत्तरादाखल, इराणनेही गेल्या काही दिवसांपासून इस्रायली शहरांवर क्षेपणास्त्रे आणि ड्रोन डागले आहेत. यामुळे या प्रदेशात धोकादायक परिस्थिती निर्माण झाली आहे. दोन्ही देश एकमेकांवर सातत्याने हल्ले करत आहेत.रशियाच्या परराष्ट्र मंत्रालयाने असा इशाराही दिला आहे की, इस्रायलकडून इराणच्या अणु प्रकल्पांवर होत असलेल्या हल्ल्यांमुळे हा प्रदेश आपत्तीच्या अगदी जवळ आला.

### अणुऊर्जा प्रकल्पावर हवाई हल्ले

आपत्तीपासून फक्त काही मिलिमीटर दूर.”इस्रायलने इराणमधील बुशेहर अणुऊर्जा प्रकल्पावर केलेले हवाई हल्ले तात्काळ थांबवावेत, असे आवाहन रशियाच्या परराष्ट्र खात्याने केले आहे. या प्रकल्पात रशियन तज्ज्ञ कार्यरत आहेत. बुशेहर हा इराणमधील एकमेव कार्यरत अणुऊर्जा प्रकल्प आहे. या ठिकाणी रशियन इंधन वापरण्यात येते. अण्वस्त्र प्रसाराचा धोका टाळण्यासाठी वापरानंतर रशिया इंधन परत घेते.इस्रायल इराण संघर्षात अमेरिकेने उडी घेऊ नये असे रशियाच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्या मारिया झाखारोव्हा यांनी म्हटले आहे. तसे झाल्यास गंभीर परिणाम होतील असा धमकीवजा इशाराही रशियानं दिला आहे.

# लोकशाही असल्याचा दावा करू शकत नाही

## आर्थिक न्यायात संविधानाची भूमिका: सरन्यायाधीश

।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**भारताचे सरन्यायाधीश बी. आर. गवई यांनी बुधवारी समाजातील असमानतेवर भाष्य केले आहे. इटलीतील मिलान येथे एका कार्यक्रमात बोलताना सरन्यायाधीश गवई म्हणाले की, समाजातील मोठ्या घटकांना दुर्लक्षित करणाऱ्या असमानतेचे निराकरण केले जात नाही, तोपर्यंत कोणताही देश स्वतःला खऱ्या अर्थाने प्रगतीशील किंवा लोकशाहीवादी म्हणवू शकत नाही.**



सरन्यायाधीश ज्या कार्यक्रमात बोलत होते, त्याचा विषय ‘देशातील सामाजिक-आर्थिक न्यायात संविधानाची भूमिका’ असा होता. यावेळी सरन्यायाधीश म्हणाले की, सामाजिक-आर्थिक न्याय हा काल्पनिक आदर्श नाही, तर समाजात स्थिरता, सुसंवाद आणि शाश्वत विकासासाठी ती एक गरज आहे.या कार्यक्रमात बोलताना सरन्यायाधीश म्हणाले की,“समाजातील मोठ्या घटकांना दुर्लक्षित करणाऱ्या असमानतेकडे लक्ष न देता कोणताही देश खऱ्या अर्थाने प्रगतीशील किंवा लोकशाही असल्याचा दावा करू शकत नाही. दीर्घकालीन स्थिरता, सामाजिक एकता आणि शाश्वत विकास साध्य करण्यासाठी सामाजिक-आर्थिक न्याय ही एक व्यावहारिक गरज आहे.”सामाजिक-आर्थिक न्याय हा केवळ मालमत्तेचे पुनर्वितरण किंवा कल्याणकारी योजनांपुरता मर्यादित नाही, तर तो प्रत्येक नागरिकाला सन्मानाने जगण्याची, त्यांच्या पूर्ण क्षमतेची जाणीव करून देण्याची, तसेच सामाजिक, आर्थिक आणि राजकीय जीवनात समान सहभागाची संधी देण्याबाबत आहे,” असे ते पुढे म्हणाले. सरन्यायाधीश म्हणाले की, “भारतीय संविधान हे केवळ एक राजकीय दस्तऐवज नाही, तर ते स्वातंत्र्योत्तर भारतातील गरिबी, असमानता आणि सामाजिक भेदभाव दूर करण्याच्या ध्येयाने बनवलेल्या समाजासाठी एक क्रांतिकारी वचन आणि आशेचा किरण आहे.

### मी एका वंचित समुदायातून आलो

हे संविधानाच्या समावेशक विचारसरणीचे आणि संधींच्या लोकशाहीकरणाचे परिणाम आहेत.”शिक्षण आणि नोकऱ्यांमध्ये असलेल्या आरक्षणाबाबत बोलताना सरन्यायाधीश म्हणाले की, इतिहासात झालेला अन्याय दूर करण्यासाठी आणि दलित, आदिवासी व मागासवर्गीयांना समान अधिकार देण्यासाठी संविधानाचा हा एक ठोस प्रयत्न आहे. ते म्हणाले की, संविधानाने लोकांना विचार करण्याची दिशा दिली आहे.या विषयावर भाषण देण्यासाठी आमंत्रित केल्याबद्दल चेंबर ऑफ इंटरनॅशनल लॉयर्सचे आभार मानताना, न्यायमूर्ती गवई म्हणाले की, सामाजिक-आर्थिक न्याय प्रदान करण्यात भारतीय संविधानाचा गेल्या ७५ वर्षांचा प्रवास हा मोठ्या महत्त्वाकांक्षा आणि महत्त्वपूर्ण यशाची गोष्ट आहे.

# प्रसिद्ध दिग्दर्शकाचं गोविंदा व सुनीता आहुजाबद्दल वक्तव्य

गोविंदा व त्याची पत्नी सुनीता आहुजा यांच्या नात्यामध्ये दुरावा आल्याचं गेल्या काही दिवसांपूर्वी म्हटलं जात होतं; तर सुनीता आहुजा यांनी घटस्फोटासाठी याचिकाही दाखल केली होती अशी चर्चासुद्धा सुरू होती. परंतु, नंतर सुनीता यांनी स्वत: या अफवा खोट्या असल्याचं म्हटलं होतं. अशातच आता चित्रपट निर्माते पहलाज निहलानी यांनी या जोडीच्या नात्याबद्दल व त्यांच्या वैवाहिक जीवनाबद्दल वक्तव्य केलं आहे. त्यांनी सध्या गोविंदा एका मराठमोळ्या अभिनेत्रीला भेटत असल्याचंही म्हटलं आहे. विकी लालवाणीसह संवाद साधताना पहलाज निहलानी यांनी गोविंदाच्या भूतकाळातील अफेअरबद्दल सांगितलं आहे. यासह पहलाज निहलानींनी गोविंदा आणि सुनीता हे कधीही वेगळे होणार नाही, असं म्हटलं आहे. या मुलाखतीदरम्यान पहलाज निहलानी यांना गोविंदा व मराठी अभिनेत्रीच्या भेटीगाठीबद्दल विचारण्यात आलं होतं. यावर ते म्हणाले, "कोणीही गोविंदा आणि सुनीता यांच्या प्रेमाच्यामध्ये येऊ शकत नाही."गविंदा व सुनीता यांच्याबद्दल ते पढे म्हणाले, "सुनीता नेहमी तिच्या मनातलं बोलते आणि गोविंदा कधीही भरकटत नाही. त्याचे दहापेक्षा अधिक अफेअर असले तरीसुद्धा त्यांचं लग्न मोडणार नाही. ते कायम वेगळेच राहत आले आहेत. तो नेहमी त्याच्या सर्व मिटिंग कायम त्याच्या बंगल्यामध्येच करत असायचा, कारण तो उशिरा झोपतो. नाहीतर सुनीता नेहमी त्याच्याबरोबर असते. त्याच्याकडे आता एकही चित्रपट नाहीये, पण तो रोज एक कार्यक्रम करतो, ज्याची सगळी व्यवस्था सुनीता करत असते." परंतु, नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीमध्ये सुनीता यांनी गोविंदाच्या व्यावसायिक आयुष्यामध्ये आता त्या लक्ष घालत नाही असं म्हटलं होतं.पहलाज निहलानी यांनी सध्या ते गोविंदा व सुनीता यांच्या संपर्कात नसल्याचं सांगितलं, पण काही दिवसांपूर्वी जेव्हा गोविंदाला बंदुकीची गोळी लागल्याचा अपघात झाला तेव्हा त्यांनी अभिनेत्याची भेट घेतली होती. पुढे पहलाज निहलानी गोविंदा व सुनीता यांच्याबद्दल म्हणाले, "ते एकमेकांचे खूप चांगले मित्र आहेत." पहलाज असंही म्हणाले की, २०२४ मध्ये सुनीता यांनी गोविंदाबरोबर घटस्फोट घेण्याचा निर्णय घेतला होता,

## सोनूला दिली होती 'दबंग 2'ची ऑफर

सोनू सूद बॉलीवूडमधील लोकप्रिय स्टार आहे. त्याने हिरोपेक्षा खलनायकाच्या भूमिकेतून चाहत्यांची मने जिंकली आहेत. २०१० मध्ये रिलीज झालेल्या सलमान खानच्या 'दबंग' चित्रपटात सोनू सूदने छेदी सिंहची भूमिका साकारून सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर ब्लॉकबस्टर ठरला होता. अलीकडेच सोनू सूदने एका मुलाखतीत त्याला 'दबंग २' मध्ये छेदी सिंहच्या भावाची भूमिका ऑफर झाली होती, पण त्याने ती नाकारली असे सांगितले आहे. 'ह्युमन्स ऑफ बॉम्बे'ला दिलेल्या मुलाखतीत सोनू सूद म्हणाला, "सलमान आणि अरबाज माझ्या कुटुंबातील सदस्यासारखे आहेत. त्यांनी मला 'दबंग २'मध्ये छेदी सिंहच्या भावाची भूमिका साकारण्यासाठी बोलावलं होतं, पण मी नकार दिला. कारण मला कोणत्याही प्रकारे ती भूमिका उत्साहित करत नव्हती. मी हे कारण त्यांना सांगितल्यावर त्यांनी "काही हरकत नाही" अशी प्रतिक्रिया दिली.सोनू सूद पुढे म्हणाला की, ""दबंग २'च्या प्रीमियरला सलमान खानने मला बोलावलं होतं आणि मी आनंदाने उपस्थित राहिलो". 'दबंग' चित्रपटाच्या क्लायमॅक्समध्ये छेदी सिंहच्या भावाचा उल्लेख आहे.

## काय करावं लागतं हे बघितलं पाहिजे



झी मराठीवरील 'काहे दिया परदेस' या लोकप्रिय मालिकेमधून प्रेक्षकांच्या घराघरांत पोहोचलेली अभिनेत्री म्हणजे सायली संजीव. या मालिकेत तिने साकारलेली गौरी आजही प्रेक्षकांच्या लक्षात आहे. या मालिकेनंतर सायलीने अनेक मालिका व चित्रपटांमध्ये काम केलं आहे. अभिनय क्षेत्रात सक्रीय असणाऱ्या सायलीला राजकारणातही तितकाच रस आहे. त्यामुळे भविष्यात अभिनेत्री राजकारणात सक्रीय होणार आहे. सायली संजीवने नुकतीच 'सुमन म्युझिक मराठी'च्या 'आम्ही असं ऐकलंय' या पॉडकास्टमध्ये हजेरी लावली होती. यावेळी सायलीला ती राजकरणात एन्ट्री करणार आहे का? यावर सायलीने तिची राजकारणात येण्यासाठीची इच्छा व्यक्त केली. तसंच राजकारणाला तरुणांनी करिअरचा एक पर्याय म्हणून बघितलं पाहिजे असं मतही व्यक्त केलं.याबद्दल सायली म्हणाली, "मला सक्रीय राजकारणात सहभागी होऊन काम करायचं आहे. मी जेव्हा राजकारणात येईन तेव्हा काही गोष्टी कदाचित बदललेल्या असतील. त्यामुळे मला आज ज्या समस्या आहेत त्याकडे बघून मी माझं तेव्हाचं ध्येय ठरवलं, तर त्याचा आता काय फायदा होणार नाही. तेव्हा त्याचा तसा संबंध नसेल."यापुढे ती म्हणाली, "मला लहानपणापासून वाटतं की, इथे घाण आहे, हा रस्ता खराब आहे, इथे पाणी नाही किंवा वीज नाही. काही ठिकाणी खड्डे तर आहेतच; पण साधा रस्तासुद्धा नाही. तर याबद्दल आपण सतत तक्रारी करण्यापेक्षा मला असं वाटतं की, आपण ते करुन बघू आणि जर ते आपल्याला जमलं तरच आपल्याला दुसऱ्यांना नावं ठेवण्याचा हक्क आहे. जर आपल्याला जमलं नाही तर ते काम खूप अवघड आहे."यानंतर सायली म्हणाली, "मला वाटतं की, आपण प्रयत्न करुन बघायला हवा. छान रस्ते, रस्त्याच्या दुतर्फा झाडे, स्वच्छता हवी, प्लॅस्टिक नको हे सगळं करण्यासाठी काय मेहनत लागते हे आपणही बघितलं पाहिजे. म्हणजे फक्त व्यवस्थेला आणि शासनाला नावं ठेवण्यापेक्षा त्यात उतरून काय

## 'सन ऑफ सरदार 2'चे पोस्टर प्रदर्शित

१३ वर्षांची प्रतीक्षा आता संपणार आहे. २०१२ मध्ये प्रदर्शित झालेला 'सन ऑफ सरदार'चा सिक्वेल आता प्रदर्शित होण्यासाठी सज्ज झाला आहे. अजय देवगणच्या या चित्रपटाचे पहिले पोस्टर प्रदर्शित झाले आहे आणि प्रदर्शनाची तारीखही जाहीर करण्यात आली आहे. पुढील महिन्यात हा चित्रपट थिएटरमध्ये धुमाकूळ घालण्यासाठी येत आहे.अजय देवगणच्या बहुप्रतीक्षित 'सन ऑफ सरदार २' या चित्रपटाचे पोस्टर रिलीज झाले आहे. पोस्टरमध्ये अजय देवगण पगडी घातलेल्या सरदाराच्या लूकमध्ये दिसत आहे. तो दोन टँकरवर उभा आहे. चित्रपटाची रिलीज डेटही जाहीर करण्यात आली आहे. हा चित्रपट २०१२ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'सन ऑफ सरदार' या चित्रपटाचा सिक्वेल आहे.'सन ऑफ सरदार २'च्या नवीन पोस्टरमध्ये अजय देवगण पिवळ्या रंगाची पगडी घालून ॲक्शनमध्ये उभा असल्याचे दिसून येते. त्याने पँट आणि टी-शर्ट घातले आहे. वर त्याने काळे जॅकेट घातले आहे. पोस्टरवर 'सन ऑफ सरदार २' लिहिले आहे. त्याची टॅग लाईन 'द रिटर्न ऑफ द सरदार' आहे. पोस्टरमध्ये त्याची रिलीज डेटदेखील लिहिली आहे.'सन ऑफ सरदार २'मध्ये अजय देवगण आणि मृणाल ठाकूर महत्त्वाच्या भूमिकेमध्ये दिसणार आहेत. अजय देवगण पुन्हा एकदा चित्रपटात जस्सीच्या भूमिकेत दिसणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन विजय कुमार अरोरा करत आहेत. या चित्रपटाची निर्मिती अजय देवगण करत आहे. नवीन पोस्टरनुसार, 'सन ऑफ सरदार २' २५ जुलै रोजी प्रदर्शित होणार आहे.'सन ऑफ सरदार' हा चित्रपट २०१२ मध्ये प्रदर्शित झाला होता. अजय देवगण व्यतिरिक्त या चित्रपटात सोनाक्षी सिन्हा आणि संजय दत्तदेखील होते. चित्रपटात असे दाखवण्यात आले होते की अजय देवगण सोनाक्षीच्या प्रेमात पडतो, पण सोनाक्षीचा भाऊ संजय दत्त या नात्याला विरोध करतो.

## अनन्याच्या नव्या चित्रपटातील लूकची होतेय चर्चा




अभिनेता कार्तिक आर्यन व अनन्या पांडे त्यांच्या आगामी चित्रपटाच्या शूटिंगमध्ये व्यग्र आहेत. 'तू मेरी मैं तेरा, मैं तेरा तू मेरी' या चित्रपटातून ही जोडी लवकरच झळकणार आहे. सध्या या चित्रपटाचं क्रोएशिया इथे चित्रीकरण सुरू आहे. अशातच या दोघांचे चित्रपटाच्या सेटवरील फोटो लिक झाले आहेत. 'तू मेरी मैं तेरा, मैं तेरा तू मेरी' या चित्रपटाच्या सेटवरील अनन्या व कार्तिक यांचे फोटो लिक झाले असून या चित्रपटातील त्यांचा लूक समोर आला आहे. 'इंडिया टुडे'च्या वृत्तानुसार समोर आलेल्या फोटोमध्ये अनन्या पांडेचा लूक हा या चित्रपटाच्या पोस्टरवर असलेल्या लूकपेक्षा खूप वेगळा आहे. यामध्ये तिच्या केसांचा रंगही नेहमीपेक्षा वेगळा असून केसांना हायलाइट करण्यात आलं आहे.कार्तिक व अनन्या यांच्या सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या या फोटोंखाली त्यांच्या चाहत्यांनी कमेंट्स केल्या आहेत. या फोटोवर एका नेटकऱ्याने, 'मी युरोपमध्येच राहतो पण मी कधीही कोणाला फिकट रंगाचे कपडे परिधान केलेले किंवा इतके मोठे कानातले घालताना पाहिलेलं नाही', तर दुसऱ्या नेटकऱ्याने, 'त्यांनी इबेरियन ट्रेंड लूक केला आहे. इटली आणि स्पेन येथील महिला अनेकदा अशा लूकमध्ये पाहायला मिळतात.' कार्तिक आर्यनने नुकताच क्रोएशिया येथील चित्रीकरण संपल्यानंतरचा एक व्हिडीओ शेअर केला होता

# टीम इंडियाचं टेन्शन वाढणार?

## संघातील प्रमुख फलंदाज सरावादरम्यान दुखापतग्रस्त

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भारत आणि इंग्लंड या दोन्ही संघांमध्ये होणाऱ्या ५ कसोटी सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना २० जूनपासून लीड्समध्ये रंगणार आहे. या सामन्यात ८ वर्षांनंतर कसोटी संघात कमबॅक करत असलेल्या करूण नायरला प्लेइंग ११ मध्ये संधी मिळणार असल्याची चर्चा सुरू आहे. मात्र, सामन्याआधीच करूण नायरबाबत मोठी अपडेट समोर आली आहे. नेट्समध्ये सराव करत असताना करूण नायर प्रसिद्ध कृष्णाचा चेंडू लागून दुखापतग्रस्त झाला असल्याची माहिती समोर येत आहे.**



तर झाले असे की, १८ जूनला भारतीय संघाचा सराव सुरू असताना करूण नायर नेट्समध्ये फलंदाजी करत होता. त्यावेळी प्रसिद्ध कृष्णा गोलंदाजी करत होता. प्रसिद्ध कृष्णाने वेगवान शॉर्ट चेंडू टाकला. नेट्समध्ये फलंदाजी करत असल्यामुळे करूण नायरला हा चेंडू व्यवस्थित टाईम करता आला नाही. त्यामुळे चेंडू त्याच्या पोटाला जाऊन लागला. चेंडू लागताच प्रसिद्ध कृष्णाने करूण नायरच्या दिशेने धाव घेत विचारपूस गेली. सुदैवाने करूण नायरला कुठलीही दुखापत झाली नाही.

त्यामुळे तो पहिल्या सामन्यात खेळण्यासाठी उपलब्ध असणार आहे.करूण नायरसाठी ही अतिशय महत्वाची असणार आहे. २०१७ मध्ये तिहेरी शतकी खेळी केल्यानंतर त्याला बरेच वर्ष संघाबाहेर राहावं लागलं आहे. आता ८ वर्षांनंतर त्याला भारतीय संघात कमबॅक करण्याची संधी मिळाली आहे. रणजी ट्रॉफी आणि विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेत त्याने धावांचा पाऊस पाडला आहे. त्यानंतर आयपीएल स्पर्धेत कमबॅक करण्याची संधी मिळताच त्याने पहिल्याच सामन्यात ९३ धावांची खेळी केली होती. त्यानंतर इंग्लंड लायन्स संघाविरूद्ध झालेल्या सामन्यात त्याने दुहेरी शतकी खेळी केली होती. हा फॉर्म पाहता त्याची इंग्लंड दौऱ्यासाठी भारतीय संघात निवड करण्यात आली आहे. तसेच त्याला प्लेइंग ११ मध्ये देखील स्थान दिले जाऊ शकते.करूण नायरच्या कसोटी क्रिकेटमधील कामगिरीबद्दल बोलायचं झालं, तर २०१६ मध्ये इंग्लंडविरूद्ध खेळताना त्याने नाबाद ३०३ धावांची खेळी केली होती. या खेळीनंतर तो एका रात्रीत स्टार झाला, पण काही महिन्यातच त्याची लोकप्रियता कमी झाली. २०१७ मध्ये त्याला ऑस्ट्रेलियाविरूद्ध खेळण्याची संधी मिळाली, या मालिकेतील ३ सामन्यांमध्ये त्याला अवघ्या ५३ धावा करता आल्या. त्यानंतर २०१८ इंग्लंड दौऱ्यावर त्याला बाकावर बसावं लागलं. मात्र त्याने माघार घेतली नाही. त्याने कमबॅक करण्याचे प्रयत्न सुरूच ठेवले.अखेर २०२५ मध्ये त्याला भारतीय संघात कमबॅक करण्याची संधी मिळाली आहे. त्याने ६ कसोटी सामन्यांमध्ये ६२.३ च्या सरासरीने ३७४ धावा केल्या आहेत. यात एका त्रिशतकी खेळीचाही समावेश आहे. १८ जूनला भारतीय संघाचा सराव सुरू असताना करूण नायर नेट्समध्ये फलंदाजी करत होता. त्यावेळी प्रसिद्ध कृष्णा गोलंदाजी करत होता. प्रसिद्ध कृष्णाने वेगवान शॉर्ट चेंडू टाकला. नेट्समध्ये फलंदाजी करत असल्यामुळे करूण नायरला हा चेंडू व्यवस्थित टाईम करता आला नाही. त्यामुळे चेंडू त्याच्या पोटाला जाऊन लागला. चेंडू लागताच प्रसिद्ध कृष्णाने करूण नायरच्या दिशेने धाव घेत विचारपूस गेली. सुदैवाने करूण नायरला कुठलीही दुखापत झाली नाही.

### करूण नायरचा रेकॉर्ड

त्यामुळे तो पहिल्या सामन्यात खेळण्यासाठी उपलब्ध असणार आहे.करूण नायरसाठी ही अतिशय महत्वाची असणार आहे. २०१७ मध्ये तिहेरी शतकी खेळी केल्यानंतर त्याला बरेच वर्ष संघाबाहेर राहावं लागलं आहे. आता ८ वर्षांनंतर त्याला भारतीय संघात कमबॅक करण्याची संधी मिळाली आहे. रणजी ट्रॉफी आणि विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेत त्याने धावांचा पाऊस पाडला आहे. त्यानंतर आयपीएल स्पर्धेत कमबॅक करण्याची संधी मिळताच त्याने पहिल्याच सामन्यात ९३ धावांची खेळी केली होती. त्यानंतर इंग्लंड लायन्स संघाविरूद्ध झालेल्या सामन्यात त्याने दुहेरी शतकी खेळी केली होती. हा फॉर्म पाहता त्याची इंग्लंड दौऱ्यासाठी भारतीय संघात निवड करण्यात आली आहे. तसेच त्याला प्लेइंग ११ मध्ये देखील स्थान दिले जाऊ शकते.

---

# “कर्माचं फळ नक्की मिळतं”

## मुकेश कुमार गंभीरवर नाराज? ती पोस्ट नेमकी कुणासाठी?

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भारतीय संघ कसोटी मालिकेत इंग्लंडचा सामना करण्यासाठी सज्ज झाला आहे. मालिकेतील पहिला सामना २० जूनपासून हेडिंग्लेच्या मैदानावर रंगणार आहे. भारतीय खेळाडू या सामन्याआधी कसून सराव करत आहे. इंग्लंड दौऱ्यासाठी बीसीसीआयने १८ सदस्यीय संघाची निवड केली होती.**

मात्र, पहिल्या सामन्याआधी वेगवान गोलंदाज हर्षित राणाचा मुख्य संघात समावेश करण्यात आला आहे.इंग्लंड लायन्स संघाविरूद्ध झालेल्या पहिया अनधिकृत कसोटी सामन्यात गोलंदाजी करताना त्याने २७ षटकात ९९ धावा खर्च करत १ गडी बाद केला होता. दरम्यान हर्षित राणाला संघात स्थान मिळाल्यानंतर मुकेश कुमारने इंस्टाग्राम अकाऊंटवर एक स्टोरी शेअर केली आहे, जी तुफान चर्चेत आहे. भारतीय संघातील वेगवान गोलंदाज मुकेश कुमारला इंग्लंडविरूद्ध होणाऱ्या कसोटी मालिकेसाठी भारतीय संघात संधी देण्यात आलेली नाही. मात्र, त्याचा भारतीय अ संघात समावेश करण्यात आला.भारतीय अ संघाकडून खेळताना त्याने दमदार गोलंदाजी करत ३ गडी बाद केले. मात्र, त्यानंतर त्याला दुसऱ्या सामन्यात खेळण्याची संधी मिळाली नाही. त्यानंतर



झालेल्या इंट्रा स्क्वॉड सराव सामन्यातही त्याला खेळण्याची संधी मिळाली नाही.आता मुकेश कुमारने इंस्टाग्राम अकाऊंटवर स्टोरी शेअर केली आहे.

ही स्टोरी त्याने कोणासाठी शेअर केली आहे, हे कळू शकलेलं नाही. मात्र, ही स्टोरी मुकेशने गौतम गंभीर आणि हर्षित राणासाठी शेअर करत असल्याची चर्चा सोशल मीडियावर रंगली आहे. इंग्लंडविरूद्धच्या कसोटी मालिकेसाठी हर्षित राणाला मुख्य संघात स्थान मिळणं हे जर खटकणारं आहे. कारण त्याला भारतीय अ संघाकडून इंग्लंड लायन्सविरूद्ध एक सामना खेळण्याची संधी मिळाली. यादरम्यान त्याला केवळ एक गडी बाद करता आला. त्यानंतर इंट्रा स्क्वॉड सामन्यातही तो फ्लॉप राहिला.मुकेश कुमारने आपल्या इंस्टाग्राम स्टोरीमध्ये लिहिले की, “कर्मा वेळेची वाट पाहत आहे. तुम्हाला नेहमी सतर्क राहावं लागेल. कर्म कधीच माफ करत नाही, त्याचं फळ नक्की मिळतं.” एकटा मुकेश कुमार नाही, तर आणखी एक गोलंदाज आहे ज्याला संधी न मिळाल्याने प्रश्न उपस्थित केले जात आहेत. भारतीय अ संघाकडून खेळताना अंशूल कंबोजने लक्षवेधी कामगिरी केली. त्याने रणजी स्पर्धेत केरळ संघाविरूद्ध झालेल्या सामन्यात एकाच डावात १० गडी बाद करण्याचा कारनामा केला होता. मात्र, इतका दमदार रेकॉर्ड असूनही त्याचा भारतीय संघात समावेश करण्यात आलेला नाही.

### संघात संधी देण्यात आलेली नाही

इंग्लंड लायन्स संघाविरूद्ध झालेल्या पहिया अनधिकृत कसोटी सामन्यात गोलंदाजी करताना त्याने २७ षटकात ९९ धावा खर्च करत १ गडी बाद केला होता. दरम्यान हर्षित राणाला संघात स्थान मिळाल्यानंतर मुकेश कुमारने इंस्टाग्राम अकाऊंटवर एक स्टोरी शेअर केली आहे, जी तुफान चर्चेत आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
। शुक्रवार ।
। दि. 20 जून 2025।
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## रामकृष्ण हरी : संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचे

# पिंपरी-चिंचवडमध्ये जल्लोषात स्वागत!

### भाजपा आमदार महेश लांडगे यांनी केले सारथ्य : आयुक्त शेखर सिंह यांच्यासाथीने हाकला पालखी रथ

। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांचा ३४० वा पालखी प्रस्थान सोहळ्याचे मोठ्या उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात उद्योगनगरी पिंपरी-चिंचवडमध्ये आगमन झाले. भाजपा आमदार महेश लांडगे आणि महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या सोबतीने पालखी रथाचे सारथ्य केले. राजकीय लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय प्रमुख यांनी वारकरी सांप्रदायाची पताका अभिमानाने खांद्यावर घ्यावी, असा सुरेख संगम यानिमित्ताने पहायला मिळाला.**



भारतीय जनता पार्टी आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने संत तुकोबांच्या पालखीचे भक्ती-शक्ती चौक, निगडी येथे दिमाखात स्वागत करण्यात आले. अवघी उद्योगनगरी तुकोबांच्या नाम गजराने दुमदुमून गेली असून, टाळ -मृदुंगाच्या तालावर वारकरी ठेका धरत आहेत. पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाच्या वतीने पालखी सोहळ्याच्या स्वागताची सर्व तयारी केली होती.

आषाढी वारीनिमित्त संत तुकाराम महाराजांचा पालखी सोहळा पिंपरी-चिंचवड शहरात भक्तिभावाने आणि जल्लोषात दाखल झाला. शहराच्या भक्ती-शक्ती चौकात वारीचे भव्य स्वागत करण्यात आले. या पार्श्वभूमीवर भाजपा आमदार महेश लांडगे यांनी पालखी सोहळ्याचे सारथ्य करत श्रद्धेचा अनोखा संदेश दिला. शहरात पालखीचे आगमन होताच, टाळ-मृदुंगांच्या गजरात, हरिनामाच्या जयघोषात वारीच्या आगमनाने वातावरण भारावून गेले. वरुणराजानेही वारीच्या स्वागतासाठी हजेरी लावली, आणि त्या सरींमध्ये हजारो वारकऱ्यांचा मेळा एकत्रितपणे आकुर्डीतील मुक्कामाच्या दिशेने मार्गस्थ झाला.

दरम्यान, भक्ती-शक्ती चौकात वारकऱ्यांसाठी विविध सेवा उपक्रम राबवले गेले. जीवनावश्यक वस्तूंचे वाटप, आरोग्य तपासणी शिबिरे, पाणी आणि फराळ व्यवस्था आणि स्वच्छतागृह व निवाऱ्याची सोय यामुळे वारकऱ्यांना अत्यंत सुलभ व सुरक्षित वातावरण मिळाले. लाडू, वॉटर बॉटल, रेनकोट, छत्री वाटप करण्यात आले. शहरातून पालखी सोहळा आकुर्डीच्या दिशेने मार्गस्थ झाला असून, हजारो भाविक, महिला, युवक आणि लहानग्यांनीही यामध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला आहे. पिंपरी-चिंचवड शहराच्या वतीने सोहळ्याला दिलेल्या शिस्तबद्ध आणि आदर्श सहकार्याचे वारकऱ्यांनी मनापासून कौतुक केले.

> “वारी ही महाराष्ट्राच्या संस्कृतीचा आत्मा आहे. वारकऱ्यांची सेवा करणं हे आमचं कर्तव्य आणि भाग्य आहे. “आषाढी वारी” ही महाराष्ट्राच्या संस्कृतीतील एक विलक्षण आणि जगात कुठेही न सापडणारी परंपरा आहे. संत तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालख्या – त्या फक्त पालख्या नाहीत, त्या श्रद्धेच्या गंगा आहेत ज्या लाखो वारकऱ्यांच्या पावलांमधून पंढरीच्या दिशेने वाहत असतात. वारी म्हणजे नुसती भक्ती नव्हे, ती शिस्त, सेवा, साधना आणि समर्पण यांचा संगम आहे.
>
> **–महेश लांडगे,**
> आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

KAMALA EDUCATION SOCIETY'S
PRATIBHA INSTITUTE OF BUSINESS MANAGEMENT
KAMALA Education Society
AICTE Permanent ID: 1-3675161 | DTE Code: 6167
Approved by AICTE | B+ NAAC Accredited
Permanently Affiliated to Savitribai Phule Pune University


ADMISSIONS OPEN
2 Years' Full Time Postgraduate Courses
& 3/4 years' Full time Undergraduate Courses
Sharpen your leadership skills through
MBA
Master of Business Administration
MCA
Master of Computer Appplications
Join PIBM to become a competent professional ....
♦ International Certifications
♦ Live Industry Projects
♦ Startup & Business Alignments
♦ Research Ventures
♦ International Case Studies
♦ Industrial Visits
♦ Foreign Language
♦ Add on Skill Certifications
♦ Sports - Cultural Configurations
♦ Cross Domain Industry Specialisation
♦ Mentoring and Seed Funds for Startups
♦ International Alumni Interactions
♦ Association as Mentor with MCED
♦ Association as Mentor with IIT's
♦ Association as Mentor with Startup India
AICTE Approved 3/4 Years' Full time Undergraduate Course
BBA
Bachelor of Business Administration
BCA
Bachelor of Computer Applications
Call for more details:
MBA/BBA : Prof. Gururaj - 8624991767 | Dr. Pallavi - 9225635556
MCA/BCA : Prof. Manish - 9823223336 | Prof. Surabhi - 9049004895
www.pibmpune.org.in
Scan QR code to know more

# “मास्टर माईंड”चा वर्धापन दिन उत्साहात!

## शिक्षण विश्व : माजी विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ व भेटकार्ड देऊन सन्मान

**। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।** मास्टर माईंड ग्लोबल स्कूल अँन्ड ज्युनियर कॉलेजचा ९ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. “स्थापना दिन म्हणजे केवळ स्मरणरंजन नव्हे, तर ज्या मूल्यांवर संस्थेची उभारणी झाली त्या मूल्यांचा गौरव करण्याचा दिवस,” अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.





> “आज शाळेच्या ९ व्या वर्धापन दिनानिमित्त मन अगदी भरून आलं आहे. एका छोट्याशा कल्पनेपासून सुरू झालेला हा शैक्षणिक प्रवास आज वटवृक्षासारखा विस्तारला आहे. या शाळेचा उद्देश केवळ गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे नव्हता, तर विद्यार्थ्यांमध्ये मूल्य, आत्मविश्वास, सामाजिक जाणीव आणि चारित्र्य यांची जाणीव रुजवण्याचा होता. गेल्या ९ वर्षांत शिक्षक, पालक, विद्यार्थी आणि संपूर्ण टीम यांनी खूप मेहनत घेतली आहे. त्यांचे मी मन:पूर्वक आभार मानते. विशेषतः माजी विद्यार्थी आजही शाळेशी जोडलेले आहेत, हे आमच्यासाठी अभिमानाचे आणि प्रेरणादायी आहे. शाळा म्हणजे फक्त अभ्यासाचे ठिकाण नाही, ती माणूस घडवण्याची प्रक्रिया आहे. पुढील वर्षांमध्येही आम्ही शिक्षणासोबत संस्कार, कला, विज्ञान आणि तंत्रज्ञान यांचा सुंदर समतोल साधत राहू.
>
> **–जयश्री गवळी,**
> संस्थापक,मास्टर माईंड ग्लोबल स्कूल अँड ज्युनियर कॉलेज.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली. या समारंभाला संस्थेच्या संस्थापक सौ. जयश्री गवळी, श्री. मनिकंदन नायर, मुख्याध्यापिका डॉ. प्रदीपा नायर, स्थापना वर्षातील माजी विद्यार्थी, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुख्याध्यापिका डॉ. प्रदीपा नायर यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन करत, शाळेच्या शैक्षणिक व सांस्कृतिक प्रगतीचा आढावा घेतला.

माजी विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ व भेटकार्ड देऊन सन्मानित करण्यात आले. त्यांनी त्यांच्या आठवणी शेअर करत शाळेबद्दलचा अभिमान व्यक्त केला. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी लेझीम, संगीत, नृत्य आदी सांस्कृतिक कला गुण सादर करत सर्वांचे मन जिंकले. विशेष आकर्षण ठरले ते इंटर-हाऊस सिंगिंग कॉम्पिटिशन, ज्यात विद्यार्थ्यांनी उत्तम गायकतेचा कस लावला. वर्धापन दिनानिमित्त सर्व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले. कार्यक्रमाची सांगता “वंदे मातरम्” या देशभक्तिपर गीताने झाली. या निमित्ताने मास्टर माईंड स्कूलच्या ९ वर्षांच्या प्रवासातील सिद्धता, गुणवत्ता आणि मूल्याधिष्ठित शिक्षणाचा वारसा यांची झलक पुन्हा एकदा अनुभवायला मिळाली.

# भुजबळ चौक-वाकडमधील खड्ड्यांवर तातडीने उपाययोजना

## आमदार शंकर जगताप यांची प्रशासनाला सूचना

**। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।** भुजबळ चौक, वाकड येथील द अँड्रेस सोसायटीसमोरील नॅशनल हायवे लगतच्या सर्विस रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात पाणी साचल्यामुळे खड्ड्यांची समस्या निर्माण झाली होती. ही बाब निदर्शनास येताच आमदार श्री. शंकरभाऊ जगताप यांनी त्वरित संबंधित विभागांना निर्देश दिले.

या सूचनेनंतर आज विशालआप्पा कलाटे, भारतीताई विनोदे, रामभाऊ वाकडकर, प्रसाद कस्पटे, श्रीनिवास कलाटे, निखिल भंडारे, अतुल कलाटे यांनी पिंपरी-चिंचवड महापालिकेचे प्रकल्प अधिकारी चंद्रकांत मोरे तसेच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI) चे अभियंता शुभम माळी आणि ईश्वर राजपूत यांच्या समवेत सर्विस रस्त्यांची पाहणी केली

पाहणीनंतर तातडीने खड्डे भरण्याचे आणि नवीन स्ट्रॉम वॉटर लाईन टाकण्याचे काम सुरू करण्यात आले. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, येत्या तीन दिवसांत हे काम पूर्ण करून रस्त्याची दुरुस्ती करण्यात येणार आहे. तसेच, भुजबळ चौक ते भुमकर चौक दरम्यानच्या राष्ट्रीय महामार्गालगतच्या दोन्ही बाजूंच्या सर्विस रस्त्यांचीही पाहणी करण्यात आली. त्यानंतर या ठिकाणीलाही खड्डे बुजवण्याचे काम तात्काळ सुरू करण्यात आले असून, हे काम पुढील दोन दिवसांत पूर्ण होईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले. या त्वरित हालचालीमुळे स्थानिक नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत असून, सार्वजनिक सुरक्षेच्या दृष्टीने ही सकारात्मक कारवाई ठरली आहे.

**नागरिकांनी व्यक्त केले समाधान**

भुजबळ चौक, वाकड परिसरातील नागरिकांनी रस्त्याच्या दुरुस्तीच्या कामाला सकारात्मक प्रतिसाद दिला असून त्यांनी आमदार श्री. शंकरभाऊ जगताप आणि प्रशासनाचे आभार मानले आहेत. स्थानिक रहिवासी श्री. अमोल पाटील म्हणाले, “या भागातील सर्विस रस्त्यावर मोठे खड्डे आणि पाणी साचल्यामुळे अपघाताचा धोका होता. काही दिवसांपूर्वी एका दुचाकीस्वाराचा अपघाती झाला होता. वेळीच हस्तक्षेप करून काम सुरू केल्यामुळे मोठा अपघात टळला.”



# पुनावळेतील रस्त्याची कामे निकृष्ट; कामाबाबत नागरिकांची तक्रार!

## आयुक्तांकडे चौकशीची मागणी; गायकवाड नगर परिसरातील डांबरीकरणात अनियमितता; स्थानिकांनी उचलला आवाज

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**पुनावळे परिसरातील गायकवाड नगर (प्रदीप स्वीट्स ते जी.के. आरकॉन रस्ता) येथे सुरू असलेल्या रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामात गंभीर अनियमितता असल्याची तक्रार स्थानिक नागरिकांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.**





पुनावळेतील रस्त्यांच्या कामाबाबत आमदार शंकर जगताप यांच्याकडे निवेदनाद्वारे लक्ष वेधले आहेत. सोसायटीधारक आणि स्थानिक नागरिकांनी चांगल्या पायाभूत सोयी-सुविधा मिळाल्या पाहिजेत. रस्त्याचे काम निकृष्ठ असल्यामुळै सामान्य नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

–**राहुल काटे,** भाजपा.



भाजपाचे राहुल काटे म्हणाले की, रस्त्याचा काही भाग नीट खोदून मजबूत पाया घालण्यात आला असला तरी, उर्वरित भागात फक्त वरून डांबरीकरण करून शॉर्टकट घेतल्यासारखी कार्यपद्धती अवलंबण्यात आली आहे. या कामाबाबत पीसीएमसीच्या अधिकाऱ्यांनी तांत्रिक कारणे सांगून समाधान देण्याचा प्रयत्न केला असला, तरी प्रत्यक्षात काही दिवसांतच रस्त्यावर खड्डे आणि उखडलेले भाग स्पष्टपणे दिसून येत आहेत.

स्थानिक नागरिकांनी यासंदर्भात रस्त्याच्या संपूर्ण चौकशीची मागणी केली असून, संपूर्ण रस्ता एकसंध आणि मजबूत पाया घालून पुन्हा बांधण्यात यावा, अशी मागणी केली आहे. प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे आहेत: रस्त्याच्या बांधकामाची तातडीने चौकशी करावी. संपूर्ण रस्ता योग्य तांत्रिक पायाभरणी करून पुन्हा बांधण्याचे आदेश द्यावा. पदपथ व डिव्हायडरमध्ये देशी वृक्षांची लागवड करावी. गंजलेले स्ट्रीटलाइट पोल हटवून नवे व दर्जेदार पोल बसवावेत. ठेकेदार व जबाबदार अधिकाऱ्यांकडून स्पष्टीकरण व आवश्यक कारवाई करावी. नागरिकांनी यासोबतच सुचवले आहे की, पुनावळे परिसरात पदपथ, डिव्हायडर आणि सार्वजनिक सुविधा उभारताना निगडी प्राधिकरणातील दर्जा व नियोजनाचे अनुकरण करावे. तसेच, ईला सोसायटीसमोर नव्याने बसवलेले गंजलेले स्ट्रीटलाइट पोल हे सौंदर्य, सुरक्षितता आणि शाश्वततेच्या दृष्टिकोनातून धोकादायक असल्याचेही निदर्शनास आणले आहे.






# व्ही. के. माटे हायस्कूलमध्ये प्रवेशोत्सव जल्लोषात

## शिक्षण विश्व: विद्यार्थ्यांचे औक्षण, पुष्पवृष्टीने आनंदाचा पहिला दिवस



। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पीएचडी मार्गदर्शक आणि सांगवी येथील बाबुराव घोलप महाविद्यालयातील अर्थशास्त्राच्या प्राध्यापिकेने पीएचडी विद्यार्थ्यांकडून लाच घेतल्याच्या प्रकरणावर विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात चर्चा झाली. आमदार शंकर जगताप यांनी या संदर्भात उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांना प्रश्न विचारले. पीएचडी मार्गदर्शकांकडून होणारे गैरव्यवहार रोखण्यासाठी कठोर उयोययोजना करावी, अशी आग्रही मागणी आमदार जगताप यांनी केली.**

पिंपरी-चिंचवड : राज्यातील सर्व शाळांसोबतच मोरया शिक्षण संस्थेच्या व्ही. के. माटे हायस्कूल व श्रीमती पार्वतीबाई प्राथमिक विद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चा प्रवेशोत्सव उत्साहात आणि जल्लोषात पार पडला.

पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे औक्षण करून, फुलं व भेटवस्तू देऊन भव्य स्वागत करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून खासदार सौ. उमाताई खापरे आणि संस्थेच्या कार्यवाह तसेच प्राचार्या सौ. इंद्रायणी माटे पिसोळकर यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले.

कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत नेटके आणि प्रेरणादायी होते. यावेळी उपमुख्याध्यापक श्री. दिलीप कुमावत, पर्यवेक्षिका सौ. मैत्रेयी राजे यांच्यासह संपूर्ण शाळा परिवाराने प्रवेशोत्सवाचा उत्साह द्विगुणित केला.

### आमदार उमाताई खापरे यांच्या शुभेच्छा...

आमदार उमाताई खापरे यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी शुभेच्छा देत, अभ्यासासोबतच कला, क्रिडा, सांस्कृतिक क्षेत्रातही सहभागी होण्याचे आणि शिस्त व संस्कृती जपण्याचे मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये विशेष आनंदाचे वातावरण होते. पालकवर्ग, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि व्यवस्थापन समितीचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# इंदिरा स्वकीयम घडविणार उद्योजक!

## डॉ. तारिता शंकर : स्वकीयम सेंटर फॉर इनक्युबेशन अँड इनोव्हेशनचे उद्घाटन



। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**पिंपरी-चिंचवड : नव उद्योजकांच्या क्षमतांना उलगडण्यासाठी, नाविन्यपूर्ण कल्पनांना स्केलेबल व्यवसायांमध्ये रूपांतरित करण्यास आणि शाश्वत उपक्रमांद्वारे आर्थिकवृद्धीस हातभार लावण्यासाठी आम्ही जागतिक दर्जाचे इनक्युबेशन प्लॅटफॉर्म स्थापित करण्याचा निश्चय केला असल्याचे इंदिरा प्रकटीकारण इंदिरा विद्यापीठाच्या तसेच इंदिरा शिक्षण समूहाच्या अध्यक्षा व मुख्य मार्गदर्शिका डॉ. तरिका शंकर यांनी केले.**

इंदिरा विद्यापीठात स्वकीयम सेंटर फॉर इनक्युबेशन अँड इनोव्हेशन फाउंडेशनचे सोमवारी (ता. १६) भव्य उदघाटन झाले. यावेळी त्या बोलत होत्या. कुलगुरू डॉ. अनघा जोशी, प्रा. चेतन वाकलकर, बलजीत गुजराल, शार्दूल गांगल, दीपंजय भालेराव, शान मेहंदळे, साहिल मेहंदळे, मनीष दालमिया, डॉ. अंजली काळकर यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. पुढे डॉ. तरिता शंकर म्हणाल्या, मार्गदर्शन-प्रशिक्षण, कार्यक्षेत्र-पायाभूत सुविधा, उद्योग-आधारित इंटर्नशिप, स्टार्टअप अभ्यासक्रम, निधी प्रवेश, कायदेशीर आणि अनुपालन समर्थन देऊन, आम्ही उत्साही उद्योजकांना त्यांचे ध्येय पूर्ण करण्यास सक्षम करतोय."

हे एक गतिमान स्टार्ट-अप इकोसिस्टम हब आहे. ज्याचे उद्दिष्ट नाविन्यपूर्ण कल्पनांचे रूपांतर उद्योगात करणे आणि उद्योजकीय प्रतिभा विकसित करणे आहे. इच्छुक संस्थापक आणि उद्योजकांना त्यांच्या कल्पनांना वास्तविक प्रभावी उपक्रमांमध्ये रूपांतरित करण्यासाठी पायाभूत सुविधा, मार्गदर्शन आणि संसाधने प्रदान करण्यात येणार आहेत. डॉ. तरिता शंकर यांच्या प्रेरनेतून हा उपक्रम साकारला असून हार्वर्ड बिझनेस स्कूलचे माजी विद्यार्थी बलजीत गुजराल यांच्या नेतृत्वाखाली वाटचाल सुरु आहे, त्यासं इन्क्युबेशन सेंटरचे संचालक आणि स्टार्टअप मेंटर डॉ. दीपंजय भालेराव व संपूर्ण स्वकीयम टीमचे पाठबळ आहे.

बलजीत गुजराल म्हणाले, "स्टार्टअप्स हे नाविन्याचे इंजिन आहे. आमचे केंद्र उद्योग जोडणी, मार्गदर्शन आणि धैर्याने त्या इंजिनला चालना देण्यासाठी डिझाइन केलेले आहे. हे इनक्युबेशन सेंटर केवळ एक जागा नाही तर उद्या आकार घेणाऱ्या शाश्वत व्यवसाय बनण्यासाठी धाडसी कल्पनांसाठी एक स्प्रिंगबोर्ड आहे."

### काय आहे स्वकीयम?

"स्वकीयम" हा शब्द संस्कृत शब्द "स्वकीय" पासून आला आहे, ज्याचा अर्थ "स्वतःचे" किंवा " आपल्यांसाठीचे असणे" असा होतो. हे नाव मालकी आणि स्व-चलित नवोपक्रमाला चालना देण्याचे सार दर्शवते, जिथे उद्योजकांना त्यांच्या कल्पनांची मालकी घेण्यास आणि यशस्वी प्रयत्नांमध्ये क्रांती घडवून आणण्यास प्रोत्साहित केले जाते.

### इंदिरा विद्यापीठाबद्दल...

३१ वर्षांचा वारसा असलेल्या इंदिरा विद्यापीठात पाच विशेष महाविद्यालये आहेत ज्या विविध पदवीपूर्व, पदव्युत्तर आणि पीएचडी कार्यक्रम देतात. स्कूल ऑफ बिझनेस, स्कूल ऑफ कॉमर्स अँड इकॉनॉमिक्स, स्कूल ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, स्कूल ऑफ लिबरल आर्ट्स आणि स्कूल ऑफ फार्मसी विद्यार्थ्यांना व्यापक शिक्षण, व्यावहारिक अनुभव आणि शंभर टक्के प्लेसमेंट सपोर्ट प्रदान करतात. अप युवर गेम" या टॅगलाइनसह, संदेश स्पष्ट आहे - विद्यार्थ्यांची कामगिरी उंचावणे, त्यांची कौशल्ये सुधारणे आणि त्यांना उच्च शैक्षणिक दर्जा आणि जीवनात मोठे यश मिळविण्यात मदत करणे! ५-टप्प्यांचा इनक्युबेशन कार्यक्रम कल्पना आणि समस्या ओळखण्यापासून सुरू होतो, नंतर पुढे जातो प्रमाणीकरण आणि बाजार संशोधन. पुढील टप्प्यात, व्यवसाय मॉडेल आणि उत्पादन विकास त्यानंतर बाजारात जाणे आणि निधी देणे ही रणनीती येते. शेवटी, डेमो डे आणि वाढीचे नियोजन उद्योजकांना त्यांचे उपक्रम संभाव्य गुंतवणूकदारांसमोर सादर करण्यास आणि शाश्वत वाढीची रणनीती आखण्यास अनुमती देते. हा संरचित दृष्टिकोन सुनिश्चित करतो की स्टार्टअप्स व्यवसायात यशस्वी होण्यासाठी आवश्यक साधने आणि मार्गदर्शनाने सुसज्ज आहेत.

---

# तात्यासाहेब शेवाळे यांची जागतिक विमा परिषदेसाठी निवड

## निगडी शाखेतील ज्येष्ठ विमा प्रतिनिधी अमेरिकेत भारताचं प्रतिनिधित्व




। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**एलआयसीच्या निगडी शाखेतील ज्येष्ठ आणि अनुभवी विमा प्रतिनिधी तात्यासाहेब शेवाळे यांची अमेरिकेतील मियामी, फ्लोरिडा येथे होणाऱ्या एमडीआरटी (MDRT) जागतिक विमा परिषदेसाठी निवड झाली आहे. ही परिषद 21 ते 25 जून 2025 दरम्यान आयोजित करण्यात आली असून, यामध्ये १२६ देशांतील ३,००० पेक्षा अधिक विमा कंपन्यांचे दहा हजारांहून अधिक प्रतिनिधी सहभागी होणार आहेत.**

तात्यासाहेब शेवाळे यांचा ३५ वर्षांचा विमा क्षेत्रातील अनुभव असून, ते पुणे-पिंपरी चिंचवड विभागातून सलग २३ वेळा जागतिक विमा परिषदेसाठी निवडले गेलेले एकमेव प्रतिनिधी आहेत. त्यांनी आपल्या कार्यकौशल्यातून विमा क्षेत्रातील अनेक उच्चतम सन्मान पटकावले आहेत. त्यामध्ये २४ वेळा MDRT आणि १० वेळा COT (COURT OF THE TABLE) हे उल्लेखनीय आहे. हे दोन्ही पुरस्कार प्राप्त करणारे ते निगडी शाखेतील एकमेव विमा प्रतिनिधी आहेत.

दीर्घकालीन सेवाभावाचे प्रतीक... या अगोदरही त्यांनी कॅनडा, सिंगापूर, दुबई, मलेशिया, हॉंगकॉंग, टर्की, शांघाय (चीन), ऑस्ट्रेलिया आदी देशांमध्ये पार पडलेल्या परिषदांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले आहे. त्यांच्या या निवडीमुळे एलआयसी, पिंपरी-चिंचवड विभाग, तसेच विमा क्षेत्रातील सहकाऱ्यांमध्ये आनंद आणि अभिमानाची भावना व्यक्त होत आहे.

तात्यासाहेब शेवाळे यांचे कार्य आणि योगदान हे उत्कृष्टता, निष्ठा आणि दीर्घकालीन सेवाभावाचे प्रतीक ठरले आहे.


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046